cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड - महाराष्ट्र | वर्ष - ४ | अंक-२१ | बुधवार दि.१ मे २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने- ६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### ही वृत्ती लोकशाहीसाठी मारक

व्हॉटस् अॅप, एक्स, इन्स्टाग्राम, फेसबुक, यूट्युब या माध्यमातून तरुणांमध्ये निवडणुका व मतदान याबद्दल कुतूहल निर्माण केले गेले तरीदेखील मतटक्का वाढला नाही. असे का झाले असावे, या मागे कडक उन्हाळा, लग्नसराई अशी कारणे दिली जात आहेत. आयोगाने अधिकाधिक प्रमाणात लोकांनी मतदान करावे यासाठी या वेळी ८५ पेक्षा जास्त वय असलेल्यांना घरातून मतदान करण्याची सोय उपलब्ध करून दिली होती; परंतु मतदान न करण्याची बळावत चाललेली वृत्ती लोकशाहीसाठी मारक तर आहेच शिवाय नागरिकत्वाचा अवमान करणारीही आहे.




# साखरेच्या एमएसपीत होणार वाढ

## » सर्व कारखान्यांना एनएफसीएसएफचे पत्र




पुणे । प्रतिनिधी

**केंद्र सरकारकडून देशातील साखरेची किमान विक्री किंमत (एमएसपी) वाढ केली जाण्याची शक्यता आहे. यासाठी सरकारला सहकारी साखर कारखान्यांकडून साखर आणि इथेनॉल उत्पादनाची राज्यवार आणि प्रदेशनिहाय वास्तविक किंमत काय आहे आणि त्याची गणना करण्याचे काम राष्ट्रीय सहकारी साखर कारखान्यांच्या महासंघावर (एनएफसीएसएफ) सोपवण्यात आले आहे. एनएफसीएसएफने देशातील सर्व सहकारी साखर कारखान्यांच्या व्यवस्थापकीय संचालक आणि महाव्यवस्थापकांना आणि सहकारी साखर कारखान्यांच्या राज्य संघटनांना पत्र लिहून साखर व इथेनॉलच्या उत्पादन खर्चाचा तपशील पाठविण्यास सांगितले आहे.**

एनएफसीएसएफने पत्रात म्हटले आहे की, पत्र मिळाल्यानंतर एक आठवड्याच्या आत माहिती पाठवावी. साखर उद्योगातून केंद्र सरकारला साखरेचा एमएसपी वाढवून, प्रचलित उसाच्या एफआरपीशी सुसंगत करण्याची मागणी होत आहे. यामुळे साखर कारखान्यांचा महसूल वाढेल आणि त्यांची तरलता स्थिती सुधारेल, ज्यामुळे शेतकऱ्यांना वेळेवर उसाची बिले देण्यास मदत होणार आहे. राज्यातील साखर उद्योगाकडून कारखान्यांना विविध कारणांनी बँकांच्या कर्जाची गरज आहे. त्यासह विविध मुद्यांवर अनेक कारखानदारांनी फडणवीस यांच्याशी चर्चा केली आहे. यात प्रामुख्याने इथेनॉल बंदी, साखर निर्यात बंदी, साखरेची किमान विक्री किंमत, कारखान्यांवर झालेली कारवाई अशा अनेक कारणांबाबत कारखानदारांनी चर्चा झाली असल्याचे सांगितले. त्यामुळे आता देशातील साखरेची किमान विक्री किंमत (एमएसपी) वाढ केली जाण्याच्या मुद्द्यावर राष्ट्रीय सहकारी साखर ◄◄ पान २ वर

## मी यादी दिली तर फिरणं मुश्कील होईल

### शरद पवारांचा धनंजय मुंडे यांना इशारा



मुंबई । प्रतिनिधी

लोकसभा निवडणुकांच्या अनुषंगाने राष्ट्रवादी विरुद्ध राष्ट्रवादी असा सामना रंगला आहे. पवार विरुद्ध पवार असाही सामना पाहायला मिळत आहे. अजित पवारांकडे असलेल्या धनंजय मुंडेंनी शरद पवारांवर थेट हल्लाबोल केला होता. शरद पवार यांनी सुनेत्रा पवार यांच्याबद्दल केलेल्या विधानाचा संदर्भ देत धनंजय मुंडेंनी त्यांच्यावर बोचरी टीका केली. शरद पवारांना मुंडेंचे हे शब्द चांगलेच टोचले आहेत. त्यामुळेच, शरद पवारांनी धनंजय मुंडेंवर शेलक्या शब्दात टीका केली. ज्यांचे तुम्ही नाव घेता, त्यांची लायकी नाही. मी यादी दिली तर फिरणं मुश्कील होईल, असे शरद पवार म्हणाले.

अजित पवार यांनी बंड केल्यानंतर धनंजय मुंडे थेट अजित पवार गटात शिरले. विशेष म्हणजे लोकसभा निवडणुकीत ते शरद पवारांवर टीकाही करायला लागले आहेत. त्याच अनुषंगाने एका कार्यक्रमात शरद पवार यांना प्रश्न विचारला असता, त्यांनी धनंजय मुंडे यांच्यावर जोरदार प्रहार केला. ज्यांचं नाव तुम्ही घेता, त्यांची लायकी नाही, त्यांना कशाकशातून बाहेर काढलं याची जर यादी दिली तर ◄◄ पान २ वर

# छगन भुजबळ-धनंजय मुंडे यांच्या भेटीने ओबीसींची वज्रमुठ आवळणार!

## » सुभाष राऊत यांच्या हॉटेल सनराईसच्या पुनरउभारणीचे निमित्त

बीड । प्रतिनिधी

**लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरु असून भाजप उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या विरोधात कधी नव्हे ते मराठा समाज एकवटला असल्याचे चित्र आहे. त्यामुळे अशा विचित्र राजकीय परिस्थितीत ओबीसी नेते व मंत्री छगन भुजबळ आणि कृषीमंत्री व ओबीसी नेते धनंजय मुंडे यांच्या भेटीने बीड जिल्ह्यातील ओबीसींची वज्रमुठ आवळणार असल्याचे म्हटले जात आहे. यासाठी पालकमंत्री धनंजय मुंडे यांची भुमिका महत्वाची ठरणार आहे. समता परिषदेचे राज्य उपाध्यक्ष सुभाष राऊत यांच्या हॉटेल सनराईसच्या पुनरउभारणीचा शुभारंभ दि. १ मे रोजी**





**दुपारी १२.३० वा. होणार आहे. याच कार्यक्रमाचे दोन ओबीसी नेत्यांच्या भेटीचे निमित्त असणार आहे.**

बीड लोकसभा निवडणुकीच्या आखाड्यात भाजप नेत्या पंकजा मुंडे या उतरल्या असल्याने संपुर्ण महाराष्ट्राचे लक्ष बीडमधील लढतीकडे आहे. मराठा आरक्षणाची धग लोकसभा निवडणुकीपर्यंत पोहचली असून अनेक गावांत पंकजा मुंडे यांना मराठा समाजाच्या रोषाचा सामना करावा लागत आहे. मराठा समाजातील तरुणांकडून पंकजा मुंडे यांच्या समोर घोषणाबाजी करण्यात येत आहे. विशेष म्हणजे मुंडे यांनी आपण मराठा आरक्षण विरोधात नाहीत, असे वारंवार सांगितले असतानाही त्यांना विरोध करण्यात येत आहे. मराठा समाज तर विरोधात जात असताना बीड जिल्ह्यातील ओबीसी समाज एकत्र होणे गरजेचे असल्याचे म्हटले जात आहे. त्यामुळे मंत्री व ओबीसी नेते छगन भुजबळ आणि दुसरे ओबीसी नेते व कृषीमंत्री धनंजय मुंडे यांची ◄◄ पान २ वर

### सुभाष राऊत महायुतीच्या व्यासपीठावर येतील



सुभाष राऊत हे मंत्री छगन भुजबळ यांचे विश्वासू आहेत. मात्र लोकसभा निवडणुकीपासून ते दोन हात दुर असल्याचे दिसत आहे. भुजबळ आणि धनंजय मुंडे यांच्या साक्षीने सुभाष राऊत यांची नाराजी दुर केली जाण्याची शक्यता आहे. तसेच महायुतीच्या व्यासपीठावर राऊत यांची यापुढे उपस्थिती दिसेल, अशी ओबीसी समर्थकांची अपेक्षा आहे.

### चौथ्या टप्प्यात राज्यात २९८ उमेदवार निवडणूक रिंगणात

मुंबई : लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यात राज्यातील ११ मतदारसंघात उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. यात ३६९ उमेदवारांचे अर्ज पात्र ठरले होते. त्यातील ७१ उमेदवारांनी माघार घेतल्याने आता २९८ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने दिलेल्या माहितीनुसार चौथ्या टप्प्यातील अंतिम ◄◄ पान २ वर

## निवडणुकीपूर्वी केजरीवालांना अटक का केली?

### सुप्रीम कोर्टाची ईडीला विचारणा

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

**स्वातंत्र्य हे खूप महत्वाचे आहे, तुम्ही ते नाकारू शकत नाही, असे स्पष्ट करत शेवटचा प्रश्न हा दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना अटक करण्यासाठी निवडलेल्या वेळेशी संबधित आहे. सार्वत्रिक निवडणुकीपूर्वीच दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना अटक का करण्यात आली, अशी विचारणा सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी (दि.३०) 'ईडी'ला केली. तसेच याबाबत शुक्रवार २ मे रोजी उत्तर द्यावे, असा आदेशही दिला.**



दिल्लीचे मुख्यमंत्री केजरीवाल यांच्या अटकेविरोधात दाखल याचिकेवर मंगळवारी न्यायमूर्ती संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती दीपंकर दत्ता यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. केंद्र सरकार अधिकारांचा गैरवापर करत असल्याचे केजरीवाल यांनी दिल्ली मद्य धोरण घोटाळ्यातील मनी लाँड्रिंग प्रकरणात अटकेविरोधात केलेल्या याचिकेत म्हटले होते. केजरीवाल यांनी यापूर्वी सर्वोच्च न्यायालयाला सांगितले होते की, ''त्यांना झालेली अटक ही मुक्त आणि निष्पक्ष निवडणुका आणि संघराज्यावर आधारित लोकशाहीच्या तत्त्वांवर हल्ला आहे.'' या याचिकेवर सोमवार, २९ एप्रिल रोजी झालेल्या सुनावणीवेळी सत्र न्यायालयात जामीन मिळविण्यासाठी अर्ज का केला नाही, असा सवाल खंडपीठाने केला होता. यावर केजरीवालांच्या वतीने युक्तीवाद करताना ज्येष्ठ वकील अभिषेक मनू सिंघवी म्हणाले की, केजरीवाल यांना २१ मार्च राजी अटक झाली. कलम १९ अन्वये अटक करण्याची काय गरज होती. केजरीवाल यांना झालेली अटक बेकायदेशीर असल्याने जामिनासाठी अर्ज दाखल केला गेला नाही. डिसेंबर २०२३ पर्यंत १० कागदपत्रांमध्ये (सीबीआय आरोपपत्रे आणि ईडी फिर्यादीच्या ◄◄ पान २ वर

## पंकजा मुंडे काँग्रेसमध्ये होत्या काय?

### सोनवणेंची मुंडे भगिनींवर टीका





बीड । प्रतिनिधी

**निवडून आल्यावर विकास करू असे म्हणता, पंकजा मुंडे या काही काँग्रेस मध्ये नव्हत्या. सत्तेत असतानाही गेल्या दहा वर्षांत का विकास करता आला नाही? असा सवाल आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांनी आष्टी तालुक्यातील बीडसांगवी येथील प्रचार सभेत केला. यावेळी त्यांनी खा.प्रीतम मुंडे यांच्यावहरी टीका केली.**

राष्ट्रवादी शरद पवार गटाचे लोकसभेचे उमेदवार बजरंग सोनवणे यांनी आष्टी तालुक्यातल्या बीडसांगवी या गावात प्रचार सभा घेतली. यावेळी बीड सांगवी गावात बजरंग सोनवणे यांचे स्वागत करण्यात आले. प्रचारसभेत बोलताना बजरंग सोनवणे यांनी धनंजय मुंडे आणि पंकजा मुंडे यांच्यावर विकासाच्या मुद्द्यावरून जोरदार टीका केली. धनंजय मुंडे भाषणातून सांगतात पंकजा मुंडे खासदार झाल्यावर बीड जिल्ह्याचा विकास करतील, मग गेली दहा वर्षे पंकजा मुंडे काँग्रेसमध्ये होत्या ◄◄ पान २ वर

### सुट्टीची सूचना

कामगार दिनानिमित्त आज दि.१ मे रोजी दै. राज्य लोकतंत्र कार्यालयास सुट्टी असल्याने, उद्या दि.२ मे रोजीचा अंक प्रकाशित होणार नाही. याची वाचक, वार्ताहर, वितरक, यांनी नोंद घ्यावी.

-व्यवस्थापक

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.३० एप्रिल २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू : १०.५० क्विंटल | २,४०० | ३,०३० | २,६२७ |
| ज्वारी/हायब्रिड : १११.०० क्विंटल | १,७२१ | ३,३७० | २,४९३ |
| मूग : ०.५० क्विंटल | ९,८५० | ९,८५० | ९,८५० |
| तूर : २.०० क्विंटल | १०,१०० | १०,५०० | १०,३०० |
| उडीद : १.५० क्विंटल | ५,००० | ६,५०१ | ५,७५० |
| बाजरी: ८.०० क्विंटल | २,६३१ | २,७०० | २,६६५ |
| चिंच/लोकल: १४.०० क्विंटल | ६,६०० | ६,६०० | ६,६०० |
| सोयाबीन: ५२.०० क्विंटल | ४,४५० | ४,५५० | ४,५१० |
| हरभरा: ३.०० क्विंटल | ५,७०० | ५,९०० | ५,७६७ |

## संविधानाला हात लावाल तर देश पेटल्याशिवाय राहणार नाही

### उद्धव ठाकरे यांचा भाजपला इशारा

बारामती । प्रतिनिधी

**बाबासाहेबांच्या संविधानामुळे गोमूत्रधारी हिंदुत्वावाद्यांच्या पोटात मुरडा आला आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील सुपुत्राने लढलेली घटना त्यांना बदलायची आहे. त्यांना महाराष्ट्राचा द्वेष आहे. याद राखा. तुम्हाला जाहीर इशारा देतो. घटनेला हात लावाल तर देश पेटल्याशिवाय राहणार नाही. हिंमत असेल तर घटना बदलण्याची तयारी करून दाखवाच, असा इशारा उद्धव ठाकरे यांनी दिला.**



शरद पवार गटाच्या उमेदवार सुप्रिया सुळे यांच्या प्रचारसभेत बोलताना उद्धव ठाकरे यांनी भाजवर जोरदार हल्ला चढवला. उद्धव ठाकरे म्हणाले, भाजपच्या नेत्यांनी संविधान बदलणार असल्याचे जाहीर विधान केले आहे. या विधानाचा माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी समाचार ◄◄ पान २ वर

## जनतेच्या संपत्तीवर वाईट नजर असलेल्या काँग्रेसला घरी बसवा-मोदी

लातूर । प्रतिनिधी

**काँग्रेसने नागरिकांची संपत्ती लुटण्याचा घातकी डाव आखला आहे. त्यासाठी ते देशवाशीयांच्या कामाईचा एक्सरे काढणार असून तुमच्या कमाईतील ५५ टक्के हिस्स्यावर कब्जा करुन तो ते त्यांच्या व्होट बँकेला वाटू शकतात. कष्टाच्या कमाईवर अशी वाईट नजर असलेल्या काँगेसला घरी बसवा. भाजप, महायुतीच्या उमेदवारास बहुमताने विजयी करा, असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लातूर येथे आयोजित जनआशीर्वाद सभेतून केले.**




मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, माजी मंत्री आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर, अशोक चव्हाण, किरण पाटील, जोगेंद्र कवाडे, उमेदवार खासदार सुधाकर शृंगारे आदींसह अनेकांची उपस्थिती होती. शैक्षणिक क्षेत्रात नाव गाजवणाऱ्या लातुरकरांना माझा नमस्कार, अशा मराठी संबोधनाने नरेंद्र मोदी यांनी सभेस सुरुवात केली. मोदी म्हणाले काँग्रेसची नजर केवळ तुमच्या वर्तमान कमाईवरच नाही. तर तुम्ही तुमच्या मुलाबाळांसाठी कमावून ◄◄ पान २ वर

## मराठा आंदोलकांनी अडवली आ.सोळंकेंची गाडी

बीड । प्रतिनिधी



**पंकजा मुंडे यांच्या प्रचारासाठी उतरलेल्या आ.प्रकाश सोळंके यांनाही मराठा समाजाच्या रोषाचा सामना करावा लागला आहे. पंकजा मुंडे यांचा प्रचार करण्यासाठी तालुक्यातील वांगी येथे गेलेल्या आ.प्रकाश सोळंके यांची मराठा बांधवांनी गाडी अडवली. तसेच, यावेळी एक मराठा लाख मराठा अशी घोषणा देत आमदार महोदयांना गावात येण्यास विरोधही केला.**

बीड लोकसभा मतदारसंघात यंदा मराठा आरक्षणाचा मुद्दा केंद्रस्थानी असल्याचे दिसून येत आहे. उपोषणकर्ते मनोज जरांगे पाटील यांचे मूळ गाव हे बीड जिल्ह्यात आहे. बीड लोकसभा मतदारसंघात भाजपा महायुतीच्या उमेदवार पंकजा मुंडे आहेत. तर, पकंजांविरुद्ध महाविकास आघाडीचे बजरंग सोनवणे मैदानात आहेत. बजरंग सोनवणे हे मराठा समाजाचे असून बीडच्या राजकीय मैदानात मराठा आरक्षणामुळे तणाव पाहायला मिळत आहे. महायुतीच्या उमेदवार पंकजा मुंडेंचा प्रचार करण्यासाठी गेलेले आमदार प्रकाश सोळंके यांची गाडी माजलगाव ◄◄ पान २ वर


# उन्हाचा चटका असह्य; राज्यातील काही भागात आज पावसाचा अंदाज

पुणे । प्रतिनिधी

**राज्यातील काही भागात ढगाळ वातावरण आणि काही भागात कडक ऊन आहे. रात्रीची उष्णताही असह्य होत आहे. हवामान विभागाने राज्यातील काही भागात बुधवारी पाऊस तर बहुतांशी ठिकाणी ऊन वाढण्याचा अंदाज दिला. तसेच उष्ण रात्रही राहील, असा अंदाज दिला आहे.**

हवामान विभागाने सिंधुदुर्ग, रत्नागिरी आणि पालघर जिल्ह्यात काही ठिकाणी उष्णतेच्या लाटेचा इशारा दिला. तर ठाणे, मुंबई आणि रायगड जिल्ह्यातही काही ठिकाणी बुधवारी उष्णतेच्या लाटेचा इशारा दिला. तसेच सांगली आणि सोलापूर जिल्ह्यातही काही ठिकाणी उष्णतेच्या लाटेचा ईशारा दिला.

मराठवड्यातील बीड आणि हिंगोली जिल्ह्यात मेघगर्जनेसह पावसाचा अंदाज आहे. तर नांदेड, लातूर आणि धाराशिव जिल्ह्यात विजा आणि मेघदगर्जनेसह काही ठिकाणी वादळी पावसाचा अंदाज दिला. तर रात्रीची उष्णताही जास्त राहील, असे हवामान विभागाने स्पष्ट केल. अमरावती, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदीया, नागपूर, वर्धा, वाशीम आणि यवतमाळ जिल्ह्यातील काही ठिकाणी विजा आणि मेघगर्जनेसह वादळी पावसाचा अंदाज हवामान विभागाने दिला. तर दुसरीकडे बुधवारपासून राज्यात हवामान कोरडे राहून उन्हाचा चटका वाढेल, असाही अंदाज हवामान विभागाने दिला आहे.



## अग्रलेख

# ही वृत्ती लोकशाहीसाठी मारक

व्हॉटस् अॅप, एक्स, इन्स्टाग्राम, फेसबुक, यूट्युब या माध्यमातून तरुणांमध्ये निवडणुका व मतदान याबद्दल कुतूहल निर्माण केले गेले तरीदेखील मतटक्का वाढला नाही. असे का झाले असावे, या मागे कडक उन्हाळा, लग्नसराई अशी कारणे दिली जात आहेत. आयोगाने अधिकाधिक प्रमाणात लोकांनी मतदान करावे यासाठी या वेळी ८५ पेक्षा जास्त वय असलेल्यांना घरातून मतदान करण्याची सोय उपलब्ध करून दिली होती; परंतु मतदान न करण्याची बळावत चाललेली वृत्ती लोकशाहीसाठी मारक तर आहेच शिवाय नागरिकत्वाचा अवमान करणारीही आहे. आता मतदानाचा टक्का वाढवण्याचे आव्हान निर्माण झाले असून, या राष्ट्रीय कार्यात प्रत्येक मतदाराचा १०० टक्के सहभाग अत्यावश्यक आहे. मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी काय करता येईल यावर आयोग, सरकार, समाजसेवी संस्था आणि सजग नागरिकांच्या सक्रिय सहभागाने विचारमंथन झाले पाहिजे. मतटक्क्यात घसरण होण्यामागे अनेक कारणे आहेत.

मतदार यादीतील गोंधळ त्या मागे असू शकतो. २०१९ च्या यादीत नावे असताना २०२४ च्या यादीतून काही मतदारांची नावे गायब झाली. राज्यात गत काही वर्षात पक्ष फोडाफोडीचे जे राजकारण झाले ते अनेक मतदारांना आवडले नाही. आज ज्याला मत दिले तो उद्या दुसऱ्या पक्षात गेला तर काय? असा प्रश्न अनेकांच्या मनात निर्माण झाला त्याचाही परिणाम मतदानावर झाला असावा. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लांबल्यामुळे पदाधिकारी व कार्यकर्त्यांची नाराजीही भोवली असावी. राज्यातील बहुतांश स्थानिक स्वराज्य संस्थांचा कारभार प्रशासकाच्या हाती आहे. कार्यकर्ते पदावर असले की उत्साहाने काम करतात. पद नसले की त्यांचा उत्साह कमी होतो. सरकारच्या कारभाराला कंटाळलेले लोक मतदानासाठी बाहेर पडत नसल्याचे बोलले जात आहे. ग्रामीण भागाच्या तुलनेत शहरी भागात कमी मतदान झाले. मोठ्या संख्येने असणारा मध्यमवर्ग मतदान केंद्राकडे फिरकलाच नाही. मतदानाची सरकारी सुटी, मतदान सुरळीत पार पाडावे म्हणून कोट्यवधी रुपयांचा खर्च, प्रत्येकाला मतदानाचा हक्क व कर्तव्य बजावता यावे यासाठी खासगी अस्थापना बंद ठेवण्याचे आदेश, मतदानाचा उत्सव साजरा करण्यासाठी शासनाने इतकी सारी तयारी करूनही सुशिक्षित शहरी मतदाराने मतदानाला हरताळ फासण्याचे काम केले. प्रत्येकाला मतदानाचा अधिकार आहे; परंतु मतदार मतदान केंद्रापर्यंत पोहोचण्याची तसदीही घेणार नसेल तर या लोकशाहीला काय अर्थ? मुंबईसारख्या मोठ्या शहरात उच्चशिक्षित आणि सधन वर्ग मोठ्या प्रमाणात असलेल्या मतदारसंघात मतदानाची टक्केवारी कमी होताना दिसते मात्र, झोपडपट्टी आणि कामगार वर्ग मोठ्या प्रमाणात असलेल्या भागात ६०–६५ टक्क्यांहून अधिक मतदान होते याला काय म्हणावे? आज स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे उलटली तरी अनेक भागात एकूण मतदारांपैकी निम्मेही मतदान केंद्रापर्यंत पोहोचत नाहीत, अशी स्थिती आहे. कोणत्याही निवडणुकीत उमेदवाराचा विजय अथवा पराभव हा मतांच्या आधारे ठरवला जातो म्हणजेच प्रत्येक मताला स्वत:चे मोल आहे. मतदानाची टक्केवारी जास्त राहिल्यास निकालाचा आकृतिबंध वेगळा दिसू शकतो. राजकारण हे व्यापक परिवर्तनाचे साधन आहे. पक्षकारण हे राजकारणापेक्षा श्रेष्ठ झाले म्हणून लोकहिताचे राजकारण मागे पडले त्यामुळे निराशा न होता, देशात मूलगामी बदल घडवण्याचा मार्ग म्हणून राजकारणाकडे पाहिले पाहिजे. लोकशाहीत संसदीय राजकारणाला महत्त्व असते आणि त्या अंतर्गत निवडणुका होत असतात. आजकाल राजकारणाचा चिखल झाला, सारेच राजकारणी संधिसाधू झाले, हमाम मे सब नंगे, अशा प्रकारची मते व्यक्त करून केवळ बोटे मोडण्यात अर्थ नसतो. शेवटी आहे त्या पर्यायांमधून योग्य पक्षाची व व्यक्तीची निवड करणे, त्यासाठी राजकारणाकडे डोळसपणे पाहणे आपल्या हाती असते. 'मला काय त्याचे, माझ्या एका मताने काय होणार आहे' असे न म्हणता देश व मतदारसंघासमोरील आव्हाने व प्रश्न कोणते याचे भान ठेवून आपण आपले कर्तव्य पार पाडायला हवे, असे झाल्यास मत टक्क्यात निश्चितपणे सुधारणा होईल.

## परिषद २५ युवा संघटकांची नियुक्ती करणार

**मुंबई । प्रतिनिधी**

मराठी पत्रकार परिषद आणखी १४ वर्षांनी आपले शतकमहोत्सवी वर्ष साजरे करीत आहेत.. परिषदेच्या शंभराव्या वर्षात परिषदेचं नेतृत्व तरूण, सक्षम नेतृत्वाच्या हाती जावे म्हणून परिषद २५ तरूण पत्रकारांची, युवा संघटकांची टीम तयार करीत आहे.. यामध्ये ३५ वर्षांच्या आतील तरूण पत्रकारांचा समावेश असेल.. प्रत्येक विभागातून मिळून एकूण २५ पत्रकारांची निवड केली जाईल.. त्यासाठी विभागीय सचिव आणि राज्य उपाध्यक्षांनी आपल्या विभागातून ३ – ३ नावं पाठवायची आहेत.. त्यातून २५ जणांची निवड केली जाईल.. त्यांना युवा संघटक म्हणून संबोधले जाईल आणि परिषदेशी संबंधीत महत्वाच्या जबाबदाऱ्या त्यांच्यावर सोपवल्या जातील.. त्यातील एकाची ''प्रमुख युवा संघटक'' म्हणून नियुक्ती केली जाईल.. भविष्यात याच तरूण युवा संघटकांमधून परिषदेचे पदाधिकारी तयार होतील.. परिषदेचा इतिहास, परंपरा, उद्देश याची माहिती त्यांना करून दिली जाईल. भविष्यात परिषदेची सूत्रं तरूण पत्रकारांच्या हाती गेली पाहिजेत अशी विद्यमान पदाधिकारयांची इचछा आहे.. त्यासाठी हा प्रयत्न आहे.. यासाठी सर्वांनी सहकार्य करावे असे आवाहन एस.एम देशमुख यांनी केलं आहे.ज्यांना युवा संघटक म्हणून काम करायची इच्छा आहे त्यांनी स्वतः देखील आपली नावं शरद पाबळे अध्यक्ष यांच्याकडे पाठवावीत असे आवाहन करण्यात आले आहे.



## आष्टी येथे राज्यस्तरीय डॉ.जबॉल क्रिडा स्पर्धेचे आयोजन

### ३० जिल्ह्यातील पुरुष व महिला संघांचा सहभाग

**आष्टी । प्रतिनिधी**

**बीड जिल्हा डॉजबॉल असोसिएशनचे वतीने आष्टी येथील भगवान महाविद्यालयाच्या भव्य मैदानावर दि.३,४,आणि ५ मे २०२४ रोजी महाराष्ट्र राज्य अजिंक्यपद ''डॉजबॉल '' स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून या स्पर्धेमध्ये राज्यातील ३०जिल्ह्यातील पुरुष संघ आणि २१ जिल्ह्यातील महिला संघ सहभागी होणार आहेत दि.३ मे रोजी सायं.६.०० वाजता या या स्पर्धेचा शुभारंभ आ.सुरेश धस, आ.बाळासाहेब आजबे आणि शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष, शिक्षण महर्षी, माजी आमदार भीमराव धोंडे अमोल जैन विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष योगेश भंडारी आणि सचिव हेमंत पोखरणा आष्टी तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष इंजि.किशोर हंबर्डे आणि महाराष्ट्र डॉजबॉल असोसिएशनचे जनरल सेक्रेटरी, शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त डॉ.हनुमंत लुंगे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये होणार आहे अशी माहिती बीड जिल्हा डॉजबॉल असोसिएशनचे अध्यक्ष अॅड. बाबुराव अनारसे आणि सचिव प्रा.डॉ.सुनील पंढरे यांनी प्रसिद्धी पत्रका द्वारे दिली आहे.**

महाराष्ट्र डॉजबॉल असोसिएशन संलग्नित असलेल्या बीड जिल्हा डॉजबॉल असोसिएशन यांच्या विद्यमाने या राज्यस्तरीय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून या स्पर्धेसाठी वरिष्ठ स्तर पुरुष आणि महिला संघ सहभागी होणार आहेत त्यामध्ये.. जळगाव, पालघर, अकोला, ठाणे, नांदेड, नाशिक, बुलढाणा, कोल्हापूर, सातारा, अमरावती, जालना, छ.संभाजी नगर, सोलापूर, नागपूर, नंदुरबार, यवतमाळ, वाशिम, पुणे, सांगली, बीड, सिंधुदुर्ग, गोंदिया, धुळे, गडचिरोली, चंद्रपूर, रायगड, रत्नागिरी, लातूर, अहिल्यानगर, परभणी आणि मुंबई शहर येथील पुरुष संघ सहभागी होणार असून. जळगाव, अकोला, पालघर, ठाणे, नांदेड, नाशिक, बुलढाणा, कोल्हापूर, सातारा, अमरावती, जालना, छ.संभाजीनगर, सोलापूर, वाशिम, पुणे, सांगली, बीड, गडचिरोली, लातूर, परभणी,आणि मुंबई शहर या २१ जिल्ह्याचे महिला संघ सहभागी होणार आहेत स्पर्धेचा शुभारंभ दि.३ मे रोजी सायं.६.०० वाजता होणार असून स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ दि.५ मे रोजी सायं.६.०० वा.भगवान महाविद्यालय आष्टी येथेच होणार आहे. या स्पर्धेमध्ये सहभागी होणाऱ्या पुरुष संघांची निवास व्यवस्था भगवान महाविद्यालय परिसरातील वस्तीगृह येथे करण्यात आली असून महिला संघाची व्यवस्था अॅड.बी.डी. हंबर्डे महाविद्यालय परिसरातील वस्तीगृह येथे करण्यात आली आहे या स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी संघटक सदस्य बंडू मुरकुटे, आशिष जगताप, आशिष महाद्वार, तुषार पानपट, भारत पानपट,शेख इरफान, उत्कर्ष औंधकर, आदेश काळे, इफत शेख, विशाल खवळे हे परिश्रम घेत आहेत. आष्टी तालुक्यातील डॉजबॉल या खेळामध्ये अनेक खेळाडूंनी प्राविण्य मिळवलेले असून अनेक राष्ट्रीय आणि स्तरावरील खेळाडू आहेत. आष्टी परिसरातील क्रीडा रसिकांना राज्यस्तरीय महिला व पुरुष संघांच्या दर्जेदार खेळाचे प्रदर्शन या निमित्ताने होणार आहे त्यामुळे परिसरातील क्रीडाप्रेमींनी उपस्थित रहावे असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

## निवडणूक निरीक्षकांनी स्ट्राँग रूमसह मतमोजणी ठिकाणाची केली पाहणी





**बीड । प्रतिनिधी**

**निवडणूक निरीक्षक अजीमूल हक यांनी मंगळवारी रात्री शासकीय तंत्रविद्या निकेतन (गव्हर्नमेंट पॉलीटेक्निक) येथे निवडणुकीनंतर ठेवण्यात येणाऱ्या बॅलेट युनिट, कंट्रोल युनिट, व्हीव्हीपॅट मशीन्सची तसेच ४ जून रोजी होणाऱ्या मतमोजणी निमित्त केलेल्या तयारीची पाहणी केली.**

शासकीय तंत्रविद्या निकेतन येथे निवडणुकीनंतर जिल्ह्यातील सहा विधानसभा मतदार संघातील मतदान मशीन ठेवण्यात येणार असल्याने येथे सुरक्षेच्या दृष्टिकोनातून काम होत आहे. या कामाचा आढावा यावेळी श्री हक यांनी घेतला. सीसीटीव्ही, कॅमेरा कंट्रोल रूम, मीडिया सेल, मतमोजणीची ठिकाण, मतमोजणी झाल्यावर राजकीय पक्षांना तसेच माध्यमांना देण्यात येणारी माहिती चे केलेले नियोजनाची त्यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. या ठिकाणी असणाऱ्या मूलभूत सुविधा याबाबत संबंधित यंत्रणेला विचारणा केली. पुढील पाहणी ७ मे ला करण्यात येणार असून त्यापूर्वी सर्व कामे व्हावीत, असे निर्देश त्यांनी यावेळी दिले. यासह त्यांनी वखार महामंडळातील गोदामात ठेवलेल्या मतदान मशीनची सीसीटीव्ही च्या माध्यमातून पहाणी केली. तसेच या परिसराचा दौरा केला.



बीडः निवडणूक निरीक्षक अजीमुल हक यांनी पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांच्याकडून बीड लोकसभा मतदार संघातील कायदा सुव्यवस्था संदर्भातली एकूण माहिती जाणून घेतली.

## वैद्यकिन्ही येथे कडब्याच्या गंजीला आग लागून एक लाखाचे नुकसान

**बीड । प्रतिनिधी**

**वैद्यकिन्ही ता.पाटोदा येथील शेतकऱ्याने आपल्या गावा शेजारील शेता मधे पशुधना साठी ज्वारी चा चार हजार कडब्याची गंज लावली होती.सोमवार ( ता.२९) रोजी दुपारी गंजी ने आचानक पेट घेतला विजवण्या करीता गावातील ग्रामस्थासह आगनिशामक दलाला पाचारण करून सुद्धा एक लाखाची कडबा जळुन नुकसान झाली आहे.**



गत वर्षापासून पाऊस समाधानकारक नसल्याने दुष्काळग्रस्त तालुका घोषित करण्यात आला आहे.या भिषण परिस्थीती चारा,पाण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे गावा मधे पिण्याच्या पाण्या साठी टँकर नागरिकांना यवस्था करण्यात आली आहे पशुधनाच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर झाला आहे.या परस्थितीवर मात करून वैद्य किन्ही येथील आल्पभुधारक शेतकरी प्रतिक दत्तात्रेय कुलकर्णी यांनी आपल्या शेता मधे आल्प पाण्यावर आपल्या शेता मधे पशुधना साठी ज्वारी चे पिक घेऊन चारा उपलब्ध केला होता. त्याची चार हजाराच्या कुडब्याची गंज लावली होती .त्या पासुन दुधाचा व्यवसाय आपल्या उपजिवीक साठी करत आहेत.पण आचानक सोमवार रोजी गंजीने पेट घेतल्याने भडका उडाला होता होता. त्या मधे पशुधनाची चारा जळु लागला त्या साठी गावातील ग्रामस्थासह आगनिशामक दिल विजवण्याचा आतोनात प्रयत्न करत होते.त्या मधे लहाण थोर तरूण जेष्ठ मंडळी सामील झाली होती या भयानक परिस्थिला झुंज देत होती .आखेर काही प्रमाणात यश आले होते.पण मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. नूकसान भरपाई देण्यात यावी आसी मागणी प्रतिक दत्तात्रेय कुलकर्णी यांनी केली आहे. तर या घटनास्थळावर जाऊन पंचनामा करण्यात आला आसल्याचे मंडळ आधिकारी बी.जे.नागरगोजे यांनी सांगितले या वेळेस तलाठी देशपांडे उपस्थित होते.

## किट्टी आडगाव ग्रामीण बँकेचे कॅशियर पट्टेकर सेवानिवृत्त

**माजलगाव । प्रतिनिधी**

**किट्टी आडगाव महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे कॅशियर बी. के. पटेकर हे वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले असून पत्रकार संघाच्या वतीने त्यांचां सत्कार करण्यात आले.**

किती आडगाव येथे ग्रामीण बँकेत म्हणून सेवा बजावणारे पटेकर हे मनमिळाऊ स्वभावाचे म्हणून परिचित होते त्यांनी या भागात ग्रामीण जनतेची बँके च्या माध्यमातून सेवा करुन आपली वेगळी ओळख निर्माणकेली होती त्यांच्या निवृत्ती मुळे माजलगाव येथिल पत्रकार संघाने यांचा सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या या वेळी पत्रकार संघाचे अध्यक्ष उमेश मोगरेकर, महेन्द्र मस्के, ज्योतीराम पाढरपोटे, कार्यकर्ते सुभाष बनसोडे, आकाश जोगदंड, महादेव उजगरे हे उपस्थीत होते.



पान १वरून...

### साखरेच्या एमएसपीत

कारखान्यांच्या महासंघाने देशातील सर्व सहकारी साखर कारखान्यांच्या व्यवस्थापकीय संचालक आणि महाव्यवस्थापकांना आणि सहकारी साखर कारखान्यांच्या राज्य संघटनांना पत्र लिहीत माहिती मागविली आहे. यामुळे साखरेच्या एमएसपीत वाढ होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

---------------

### छगन भुजबळ–धनंजय मुंडे यांच्या

दि. १ मे रोजी बीडमध्ये होणारी भेट महत्वाची ठरणार आहे. भुजबळ हे बीडमध्ये अॅड. सुभाष राऊत यांच्या हॉटेलच्या पुनरउभारणीच्या कार्यक्रमासाठी उपस्थितीत राहणार आहेत. राऊत यांची हॉटेल सनराईस मराठा आरक्षण आंदोलन काळामध्ये जाळण्यात आली होती. यात त्यांच्या हॉटेलचे २ ते ३ कोटीपेक्षा जास्त नुकसान झाले होते. हॉटेलच्या पुनरउभारणीच्या कार्यक्रमात भुजबळ आणि मुंडे हे एकाच व्यासपीठावर दिसणार आहेत. त्यामुळे लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर बीड जिल्ह्यातील ओबीसी समाजाची वज्रमुठ आवळण्यासाठी कृषीमंत्री धनंजय मुंडे हे महत्वाची भुमिका बजवण्याची शक्यता आहे. तसे झाले तर भाजप उमेदवार पंकजाताई मुंडे यांची बाजी भक्कम होण्यास मदत होईल, असे म्हटले जात आहे. दरम्यान धनंजय मुंडे हे प्रचार सभे निमित्त दि.१ मे रोजी पुणे जिल्ह्यात आहेत. सभा संपल्यानंतर ते भुजबळांची भेट घेतील असा अदाज व्यक्त केला जात आहे.

------------

### मी यादी दिली तर

त्यांना फिरणं मुश्कील होईल, असे म्हणत शरद पवारांनी धनंजय मुंडेंचं नाव न घेता जबरी पलटवार केला. एकंदरीत त्यांनी केलेले उद्योग मी आता बोलू इच्छित नाही. त्यांना एक लहान कुटुंबातला, लहान समाजातला एक उदयोन्मुख तरुण दिसतो म्हणून त्यांना हाताला धरुन विरोधी पक्षनेतेपदाची जबाबदारी दिली. लोकांची नाराजी होती, हे सगळं माहिती असतानासुद्धा ते आता माझ्यावर व्यक्तिगत हल्ले करायला लागले, कुटुंबावर हल्ले करायला लागले त्याच्यावर मी आता भाष्य करणार नाही. आज शेवटचा उल्लेख त्यांच्याबद्दलचा माझ्याकडून होईल, अशी संतापजनक प्रतिक्रिया शरद पवारांनी दिली आहे. त्यामुळे, धनंजय मुंडेंकडून होत असलेल्या व्यक्तिगत टीकेवर शरद पवारांनी नाव न घेता मुंडेंना चागलेच सुनावल्याचे दिसून येत आहे.

-------------

### पंकजा मुंडे काँग्रेसमध्ये होत्या काय?

का, त्यांना विकास का करता आला नाही, असा सवाल बजरंग सोनवणे यांनी केला. तर प्रीतम मुंडे खासदार असताना त्यांनी धनगर आरक्षण, मुस्लिम आरक्षण आणि मराठा आरक्षणावर सभागृहात एकदाही आवाज उठवला नाही, असे म्हणत सोनवणे यांनी प्रीतम मुंडे यांच्यावर देखील टीका केली.

----------------

### निवडणुकीपूर्वी केजरीवालांना

तक्रारीसह) केजरीवालांचे नाव नाही, असे सांगत कलम ५० पीएमएलए द्वारे कोर्टात साक्षीदारांच्या साक्षीदारांच्या जबाबाकडे अॅड. सिंघवी यांनी लक्ष वेधले होते.

**निवडणूक काळातील अटकेवर आक्षेप**

या प्रकरणी केजरीवालांना अटकेची वेळ ही महत्त्वाची आहे. कारण ईडीने त्यांना बराच काळ अटक केली नाही. मात्र निवडणुकीसाठी लागू केलेल्या आदर्श आचारसंहितेनंतर का अटक करण्यात आली. संशयावर अटक करणे ही कलम ४५ पीएमएलए मध्ये देखील ही मर्यादा आहे, असे अॅड. सिंघवी यांनी यावेळी सांगितले. यावर न्यायमूर्ती खन्ना यांनी स्पष्ट केले की, तुम्ही अटकेसंदर्भात कलम १९ वर लक्ष केंद्रित करत आहात, आम्हाला समजले आहे. यावर सिंघवी यांनी केजरीवाल हे २४ मार्चपर्यंत आरोपी किंवा संशयित नव्हते, याकडे लक्ष देण्याची विनंती सर्वोच्च न्यायालयास सोमवार, २९ एप्रिल रोजी झालेल्या सुनावणीवेळी केली होती.

----------

### चौथ्या टप्प्यात राज्यात २९८

निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची संख्या २९८ एवढी आहे. यात नंदुरबार ११, जळगाव १४, रावेर २४, जालना २६, औरंगाबाद ३७, मावळ ३३ , पुणे ३५, शिरुर ३२, अहमदनगर २५, शिर्डी २०, बीड ४१ अशी संख्या आहे. या ११ मतदारसंघांमध्ये १३ मे रोजी मतदान होणार आहे.

-----------

### मराठा आंदोलकांनी

तालुक्यातल्या वांगी गावात पोहोचल होती. यावेळी, मराठा बांधवांनी सोळंके यांची गाडी अडवून एक मराठा लाख मराठा अशी घोषणाबाजी केली. विशेष म्हणजे दोन दिवसांपूर्वी आमदार प्रकाश सोळंके हे लऊळ गावामध्ये कार्यकर्त्यांची बैठक घेण्यासाठी गेले होते. त्यावेळी बैठक सुरू असताना मराठा बांधवांनी सोळंके यांना विरोध केला होता. त्यानंतर, पुन्हा एकदा मराठा आरक्षणाच्या प्रश्नावरून आमदार प्रकाश सोळंके यांना मराठा बांधवांच्या रोषाला सामोर जावे लागले आहे.

-------

### जनतेच्या संपत्तीवर वाईट नजर

ठेवलेल्या संपत्तीवरही वारसा कराच्या रुपाने त्यांचा डोळा आहे. त्यांच्या जाहीरनाम्यावर मुस्लीम लिगची छाप आहे. अशांना तुम्ही साथ देणार का? असा सवाल त्यांनी यावेळी केला. आपला देश गत दहा वर्षांपासून विविध क्षेत्रात गतीने पुढे जात आहे. क्रीडा क्षेत्रात खेळाडू विक्रम करीत आहेत. विविध क्षेत्रातही नव नवीन रेकॉर्ड बनत आहेत. जगात भारतीय अर्थव्यवस्था गतीने प्रगती करीत आहे. देशाच्या सीमेवर वाईट नजर ठेवण्याची आता कोणाची हिंमत उरली नाही. कोणी आगळीक केली. तर त्याला कसा धडा शिकवतो, हे सर्जीकल स्ट्राईलने दाखवले आहे. आयआयटी, आयआयएम, एम्स चा मोठा विस्तार झाला आहे. देशात वैद्यकीय महाविद्यालयाची तसेच जागांची संख्या वाढवली आहे. देशाला तुकड्या तुकड्यात पहाणारे काँग्रेसचे लोक आता पंतप्रधान पदही तुकड्या तुकड्यात वाटू इच्छितात. बारी बारीने या माध्यामातून देशाला लुटण्याची त्यांची योजना आहे. काँग्रेसने एसी, एसटी, ओबीसींचे नेतृत्व कधीही पुढे येऊ दिले नाही. मात्र, आम्ही या घटकांना प्राधान्य देत ६० टक्क्यांपेक्षा अधिक प्रतिनिधित्वही दिले. मोफत घरे, मुद्रा लोन, हर घर नल, महिला आरक्षण अशी अनेक लोककल्याणकारी कामे करुन सामाजिक न्यायाला ताकद दिली. तथापि काँग्रेसने केवळ समस्याच दिल्या. समस्या आणि काँग्रेस ही जुळी भावंड आहेत, अशी टीका मोदींनी यावेळी केली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काँग्रेसने देशात भ्रष्टाचाराचा पॅटर्न तयार केला होता. परंतु, भाजपाच्या नेतृत्वातील सरकारने विकासाचा नवा पॅटर्न सेट केला आहे. युतीकडे महामार्गांचे जाळे आहे. तर आघाडीकडे रस्त्यांवर फिरूनही लाँच न होणारा युवराज असल्याची टीका केली. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी निवडणुका संपताच शेतकऱ्यांना सोयाबीन भावांतराचे ४ हजार कोटी देण्याचा निर्णय घेण्याचे आश्वासन दिले. विरोधकांकडे नेता, नीती व नियतही नाही. ते देश चालवू शकत नाहीत. त्यांची गाडी विना डब्यांची असल्याची टिका केली. प्रेरणा होनराव यांनी सूत्रसंचलन केले.

-----------

### संविधानाला हात लावाल तर

घेतला. घटना बदलण्यासाठी त्यांना बहुमत हवे आहे. महाराष्ट्राच्या सुपुत्राने, दलित कुटुंबात जन्मलेल्या माणसाने म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ही घटना लिहिली आहे. तेच भाजपला खूपत आहे. हा दलित समाजात जन्मलेला माणूस बुद्धिमान कसा असू शकतो? असे त्यांना वाटत आहे. भाजपने १० वर्षात आरक्षण दिले का नाही? कोर्टाने दिल्लीच्या अधिकाराबाबत केजरीवालांच्या बाजूने निकाल दिला. पण भाजपने लोकसभेत बिल आणले आणि कोर्टाचा निर्णय बदलला. जर तुम्ही कोर्टाचा निर्णय बदलण्यासाठी विधेयक आणू शकता तर धनगर आणि मराठा समाजाला आरक्षणासाठी असे का केले नाही? त्यांना आरक्षण का दिले नाही? तुम्ही आरक्षणाचे विधेयक आणा आम्ही पाठिंबा देतो म्हणून सांगितले. पण तरीही यांनी काहीच केले नाही, असा आरोप उद्धव ठाकरे यांनी केला.

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
बुधवार, दि. १ मे २०२४ | ३

# बोटावरील शाई दाखवा, तपासणीत अर्धी फिस माफ -डॉ. राहुल धाकडे यांचा उपक्रम



**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

मतदान केल्यानंतर बोटीवरील शाई दाखविल्या नंतर आपल्या रुग्णालयाच्या ओपीडीत अर्धी फीस माफ केली जाणार असल्याचा नवा फंडा येथील अंबाजोगाई मेडिकल प्रॅक्टिस असोसिएशनचे अध्यक्ष डॉ. राहुल धाकडे यांनी समोर आणला आहे.

लोकसभा मतदानाचा टक्का वाढला पाहिजे यासाठी अनेक नवनवीन उपक्रम शासन व सामाजिक संस्था राबवित आहेत. बीड जिल्हा लोकसभेसाठी १३ मे रोजी मतदान होणार आहे. या पार्श्वभूमीवर मतदान जनजागृती अभियान सुरूच आहे. येथील प्रसिद्ध श्वसनविकार व छाती रोग तज्ज्ञ डॉ राहुल धाकडे यांनी आपल्या रुग्णालयाच्या ओपीडी फीस मध्ये मतदान करणाऱ्या मतदार यांना १४,१५,व १६ मे अशी तीन दिवस अर्धीच फिश आकारणार असल्याचा निर्णय जाहीर केला आहे. मतदारांना प्रोत्सान मिळावे. म्हणून हा उपक्रम राबविला असल्याचे त्यांनी सांगितले.

# लोकसभा निवडणुकीच्या काळात अंजडोहचा पाणी प्रश्न पेटणार;ग्रामस्थांचा अमरण उपोषणाचा इशारा

## चौकशी समितीकडून कार्यकारी अभियंता यांच्या आदेशाला केरची टोपली

**किल्लेधारूर । प्रतिनिधी**

धारूर तालुक्यातील अंजनडोह येथील पाणी प्रश्न भर निवडणुकीत पेटणार जल जीवन योजनेचे काम बंद असल्यामुळे ग्रामस्थ आक्रमक होताना दिसत आहेत. ग्रामस्थांचा भीषण पाणी प्रश्न सोडवण्यासाठी जल जीवन विकास योजने अतर्गत रेपेवाडी साठवण तलावावरून पाईप लाईन जानेवारी २०२३ रोजी मंजूर करण्यात आली होती या योजनेमुळे अजनडोह करांचा पाण्याचा प्रश्न कायमचा मिटणार होता. सध्या परस्तिथित गावामध्ये पाण्याची अत्यन्त बिकट परस्तिथी आहे,गावकर्यांना पाण्यासाठी भेटकंती करावी लागत आहे.

लहान मुले महिला व व्यस्कर नागरिक यांना डोक्यावर लांबून पाणी आणावे लागत आहे पाण्यासाठी ग्रामस्थांनचे अतोनात हाल होत आहेत सदरील पाईप लाईन चे काम मागील सहा महिन्यापासून बंद आहे. पाईप लाईन चे काम बंद न ठेवता जर सुरळीत चालू ठेवले असते तर आज पर्यंत ही योजना कार्यनवीत झाली असती आणी गावातील नागरिकांना पाणी उपलब्ध झाले असते पण गुत्तेदाराच्या मनमानी कारभारामुळे काम सहा महिने झाले बंदच आहे. सदरील योजनेचे काम पुन्हा सुरु करावे म्हणून गावातील सामाजिक कार्यकर्ते ,नागरिक व सरपंच यांनी वरिष्ठ कार्यालयामध्ये गुत्तेदार मातकर यांच्या विरोधात तक्रार केल्या होत्या परंतु त्याची कसलीच दखल घेतली नसल्याने अजून ही काम सुरु झाले नाही ,भर उन्हाळ्यात पाणी मिळत नसल्याने गावकरी संतप्त झाले आहेत जी.प. मुख्याधिकारी यांना निवेदन देऊन अमरन उपोषण करणार असल्याचा इशारा अंजनीडोह ग्रामस्थ व सरपंच उषा सोळंके यांनी दिला आहे. येत्या ५ मे २०२४ पर्यंत पाईप लाईन चे काम सुरु न केल्यास मोजे अंजनडोह येथील ग्रामपंचायत कार्यालया समोर ग्रामस्था सोबत दी ६ मे पासून अमरन उपोषण करणार असल्याचे निवेदन बीड जी.प.मुख्यकार्यकारी अधिकारी यांना निवेदन दिले आहे.

### कार्यकारी अभियंता यांच्या आदेशाला केरची टोपली

अंजनडोह येथील जल जीवन योजनेचे काम बंद असल्याच्या तक्रारीरी ची दखल घेऊन कार्यकारी अभियंता यांनी सदरील योजनेची चवकशी करण्यासाठी दी १७ एप्रिल २०२४ रोजी आदेश काढले होते .आदेश मिळाल्या पासून दोन दिवसात अहवाला सादर करण्याच्या सूचना करण्यात आल्या होत्या परंतु अजून ही चवकशी समिति गावांत आली नसल्याचे ग्रामस्थ नी सांगिले.त्या मुळे कार्यकारी अभियता यांच्या आदेशला हरताळ फसल्याचे दिसते.

गावातील लोकांना पाण्यासाठी वन वन भटकावे लागत आहे पाईप लाईन चे काम पूर्ण न झाल्या मुळे गावातील लहान मुले व्यस्कर नागरिक तसेंच महिला ना लांबून पाणी आणवे लागत आहे पाण्यासाठी ग्रामस्थांची फरफट होत आहे. पाईप लाईन चे काम सुरु न झाल्यास सहा मे पासून ग्रामस्था सोबत अमरन उपोषण करणार
–उषा सोळके, सरपंच अंजनडोह



# कडा येथील पुलाचे काम १५ जुन पर्यंत होणार

**आष्टी । प्रतिनिधी**

नगर बीड रस्त्यावरील कडा येथील कडी नदीवरील पुलाची एक बाजू किमान १५ जून पर्यंत पूर्ण करण्यासाठी प्रयत्नशील असल्याची माहिती देशमुख कन्स्ट्रक्शनच्या वतीने देण्यात आली.

नगर बीड रस्त्यावर आष्टी ते साबलखेड दरम्यान रस्त्याचे काम सुरू आहे . या रस्त्यावरील कडा गावातून वाहणाऱ्या कडी नदीवरील पूल पाडण्यात आला असून नवीन पुलाचे काम सुरू आहे . पुलाचे पाडकाम केल्यानंतर या रस्त्यावरील वाहतूक तात्पुरत्या वळण रस्त्याने सुरू आहे . जूनमध्ये पावसाळा सुरू होतो , मोठा पाऊस आला तर नदीला पुर येत असतो. त्यामुळे वळण रस्ता जर वाहून गेला तर सर्व वाहतूक ठप्प होऊ शकते. त्यामुळे या पुलाचे काम तातडीने होणे आवश्यक आहे . पुलाच्या कामाची सद्यस्थिती पाहण्यासाठी कडा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती रमजान तांबोळी , सामाजिक कार्यकर्ते अनिल ढोबळे यांनी पत्रकारांसह या कामाची पाहणी केली. त्यावेळी नियोजित पुल कसा असेल याची माहिती देऊन १५ जून पर्यंत पुलाच्या एका बाजूचे काम पूर्ण करून त्यावरून वाहतूक सुरू करण्यासाठी प्रयत्नशिल असल्याचे देशमुख कन्स्ट्रक्शन च्या वतीने सांगण्यात आले.

# रस्त्याचे रुंदीकरण झाले मात्र समस्या कायम

## अतिक्रमणधारकांमुळे वाहतुकीची समस्या कायम

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

शहरातील मुख्य रस्ते, अंतर्गत रस्ते, नाल्याचे काम सुरू करण्यासाठी अतिक्रमन हटविण्यात आले होते.बहुतांश रस्त्याचे व नाल्याचे कामे पूर्ण होताच अतिक्रमनाची जैसे थे परिस्थिती निर्माण झाली आहे. परिणामी शहरातील वाहतूक समस्या कायम आहे.




अतिक्रमनामुळे वहातुकीची कोंडी सुटत नसून असुन नगरपालीका प्रशासन, सार्वजनिक बांधकाम विभागाकडून वाहतुकीला अडथळा ठरणारे अतिक्रमन तात्ताकाळ काढण्याची मागणी होत आहे. अंबाजोगाई शहरात शासनाची ठिकठिकाणी मोकळी जागा आहे. विविध शासकीय कार्यालये, दवाखाने, शाळा, मोठ्या प्रमाणात शहरात आहेत. शहराची झपाट्याने वाढणारी लोकसंख्या, ग्रामीण भागातून येणारे लोंढे यामुळे सध्या शहरात गर्दीच गर्दी झाली आहे.शहरात जागा दिसेल त्या ठीकाणी होणारे अतिक्रमन सर्वांची डोकेदुखी ठरत आहे. शहरातील मुख्य ठिकाण आसलेल्या छत्रपती

शिवाजी महाराज चौक, बसस्थानक ते भगवानबाबा चौक, मुख्य रस्ता,योगेश्वरी देवी मंदीर रस्ता,मोंढा बाजार रस्ता व स्वाराती रूग्णालय या चारही मुख्य रस्त्यावर व खास करुण पोस्ट ऑफीस,,बसस्थानक, तहसील परिसरात अतिक्रमनधारकांचा विळखा पडला आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता गौरीशंकर स्वामी यांच्याबद्दल नागरिकांमध्ये तीव्र नाराजी असून ते कार्यालयात कधीही उपस्थित नसतात अशी तक्रार करण्यात येत आहे.यापूर्वी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे तालुकाध्यक्ष अमर देशमुख व कार्यकर्त्यांनी स्वामी यांच्या रिकाम्या खुर्चीला हार घालून निषेध व्यक्त केला होता.अतिक्रमन बाबतीत स्वामी यांना संपर्क केला असता मोबाईल बंद होता.

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज एक क्रांतिकारी संत -प्राचार्य आबासाहेब हांगे

**पाटोदा । प्रतिनिधी**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी केवळ अध्यात्मिक जागृती केली नाही तर सामाजिक जागृती करून जनसामान्यांना कर्तव्याची जाणीव सुद्धा करून दिली असे प्रतिपादन प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे यांनी केले. येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात ३० एप्रिल रोजी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली त्याप्रसंगी ते अध्यक्षीय समारोपात बोलत होते.

कार्यक्रमात प्रथम तुकडोजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. व्यासपीठावर ग्रंथपाल प्रा. जगन्नाथ पटाईत, डॉ. संजय बोंडगे, प्रा. संतोष खाकरे उपस्थित होते




प्राचार्य हांगे पुढे म्हणाले की तुकडोजी महाराजांनी ग्रामजीवनाच्या प्रत्येक पैलूंचा विचार ग्रामगीतेत केला आहे. आयुष्यभर ते खेड्यापाड्यात फिरले व लोकांचे दुःख दूर करण्यासाठी त्यांनी आयुष्य वेचले. कार्यक्रमास प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## पान ६ वरून...

### शेतकऱ्याला न्याय देवू शकले नाहीत

चकार शब्द काढलेला नाही. घाटनांदुर-श्रीगोंदा हा रेल्वे मार्गाचे सर्वेक्षण होवून देखील अद्यापही त्याचे कारवाई झालेली नाही. जिल्ह्यात एकही बेरोजगारांना रोजगार मिळेल असा प्रकल्प आणला नाही. उलट दोन कारखाने असताना देखील परळीच्या मुंडे कुटूंबियांनी ऊसाचे बील बुडवून शेतकर्यांना देशोधडीला लावले अशा नेत्यांना निवडून देणार का? असा आरोप हिंगे यांनी केला. तर केजचे भाईजान यांनी दोन- दोन कारखाने चालु केले परंतु आपल्या भागातील शेतकर्यांना न्याय दिला का? मागच्या निवडणूकीत पाच लाख मते देणार्या शेतकर्यांची कधी भेट तरी घेतली का? अशा उमेदवाराला निवडूण देणार का? दोन्ही मुंडे-महिण भाऊ एक झाल्याने जिल्ह्याच्या विकासाला खिळ बसणार हे मात्र निश्चित आहे. बीड जिल्ह्यातला ऊस पश्चिम महाराष्ट्रात गेल्यानंतर तेथील कारखान्याच्या ऊस गाळपाचा उतारा १३.५ येतो मग बीड जिल्ह्यातल्या का १०.५ चाच उतारा कसा येतो. असा प्रश्न उपस्थित करत शेतकर्यांना लुटून हे उमेदवार निवडणूक लढवित आहेत. त्यामुळे सर्वसामान्यांच्या कुटूंबातून आलेला मी कार्यकर्ता आहे. बीड जिल्ह्याच्या विकासासाठी व जिल्ह्यातील तीन रेल्वे मार्गासाठी प्रयत्न करणार असल्याचे वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे यांनी सांगितले. पत्रकार परिषदेस जिल्हाध्यक्ष शैलेश कांबळे, माजी जिल्हाध्यक्ष अनिल डोंगरे, तालुकाध्यक्ष खाजामिया पठाण, शहराध्यक्ष गोविंद मस्के यांच्यासह वंचित बहुजन आघाडीच्या पदाधिकार्यांची उपस्थित होती.

### महायुतीचा आघाडी धर्म

सुधाकर टेकाळे यांच्यासह शेकडो कार्यकर्ते सहभागी झाले होते.

राज्याचे उपमुख्यमंत्री मा. ना. अजितदादा पवार , कृषिमंत्री तथा जिल्याचे पालकमंत्री मा. ना. धनंजय मुंडे यांच्या संकल्पना व मार्गदर्शनाखाली बीड जिल्ह्यात महायुतीचा धर्म निभावत राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने अंबाजोगाई शहर व परिसरात प्रचारा दरम्यान कुठलीही कसर सोडली जात नसल्याचे पहावयास मिळत आहे.

या प्रचारफेरीत विष्णू पांचाळ,सुभाष पानकोळी, जावेद गवळी, विशाल पोटभरे,दत्ता हिरवे, अमित परदेशी, संतोष चिमणे, तौफिक शेख, जावेद भाई, कालिदास पवार,अस्लम शेख, सुशील जोशी, आकाश कऱ्हाड, महेबूब गवळी, रोशन लाड,महेश कदम,सुगत सरवदे, शरद काळे,अमोल मिसाळ यांच्यासह शेकडो राष्ट्रवादी काँग्रेस, भाजपा चे कार्यकर्ते सहभागी झाले होते. रॅलीदरम्यान महायुतीचा विजय असो, ना. अजितदादा पवार, ना. धनंजय मुंडे, पंकजाताई मुंडे, राजकिशोर मोदी यांच्या घोषणाने परिसर दुमदुमून गेला होता.

### आ.संदीप क्षीरसागर

मित्रपक्षांचे पदाधिकारी, स्थानिक कार्यकर्ते व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. आ.संदीप क्षीरसागर हे बजरंग सोनवणे यांच्या प्रचारासाठी दररोज बीड मतदारसंघासह जिल्ह्यातील अनेक भागात फिरत आहेत. दरम्यान सर्वसामान्य लोकांकडून बजरंग सोनवणे यांना प्रचंड सकारात्मक प्रतिसाद मिळत चालला आहे.

# श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात विद्यार्थ्यांनी घेतली मतदार जागृतीची शपथ

**माजलगाव । प्रतिनिधी**

भा शि. प्र. संस्था अंबाजोगाई संचलित श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात मतदार जनजागृती कक्ष व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने नवमतदार युवक -युवती तसेच सर्व नागरिकांत मतदान करण्याबाबत जागृती व्हावी या दृष्टीने मतदारांना मतदानासाठी प्रेरित करण्याच्या दृष्टीने जिल्हा स्वीप नोडल अधिकारी छत्रपती संभाजीनगर यांच्या सूचनेनुसार विद्यार्थ्यांनी निर्भयपणे मतदान करून कुठल्याही भूलथापांना बळी पडणार नसल्याची शपथ दिली.



या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सुहास मोराळे, उपप्राचार्य डॉ.गजानन होन्ना, उपप्राचार्य डॉ. युवराज मुळये यांच्या प्रमुख उपस्थितीत डॉ. कमलकिशोर लड्डा, डॉ. रमेश गटकळ, डॉ. जिजाराम बागल यांनी प्रत्येक वर्गात जावून मतदान हे अनमोल दान आहे हे 'मतदारांसाठीच्या प्रतिज्ञेद्वारे सांगितले.

सध्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर च्या द्वारे सर्व महाविद्यालयात विद्यापीठ परीक्षा ह्या अंतिम टप्प्यात आहेत.त्यानुसार परीक्षा सुरु होण्याच्या प्रारंभी विद्यार्थ्यांनी भयमुक्त मतदान करून लोकशाही बळकट करण्यासाठी अवाहन सर्वांना करण्यात आहे. या अगोदर महाविद्यालयात मतदार जागृतीसाठी काही उपक्रम वर्षभरामध्ये राबविण्यात आले. यामध्ये मतदार जागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. नव मतदारांची नोंदणी देखील तहसील कार्यालय माजलगाव यांच्या वतीने करण्यात आली. राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी निवडणूक प्रक्रियेमध्ये या अगोदर सहभाग नोंदवून वृद्ध, दिव्यांग यांना मतदान करण्यासाठी मदत केली. हे सर्व कार्यक्रम महाविद्यालयातील मतदार जनजागृती कक्ष व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने पार पडले.

# ज्ञानराधाच्या संचालकासह कर्मचाऱ्यावर गुन्हे दाखल करण्याचा न्यायालयाचा आदेश

**माजलगाव । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील अनेक मल्टीस्टेटने खातेदाराच्या पैशावर डल्ला मारलेला असून त्यापैकीच ज्ञानराधा मल्टीस्टेटने अनेक खातेदारांना चुना लावलेला आहे परंतु पोलीस प्रशासनाकडे अनेक खातेदारांनी ज्ञानराधा मल्टीस्टेटच्या संचालकासह कर्मचाऱ्यांनी संगणमत करून फसवणूक केल्याबाबत रीतसर लेखी तक्रारी दिल्यानंतर देखील पोलीस प्रशासनाने आद्याप गुन्हा दाखल न केल्याने शिवकांता गौरीशंकर तोडकरी, दिनकर हांगे, दत्तात्रय पारडकर, आशाबाई पारडकर ,चतुराबाई पारडकर या खातेदारांनी माजलगाव येथील सत्र



**ॲड. नारायण गोले पाटील यांचा युक्तीवाद**

न्यायालयात धाव घेऊन ज्ञानराधा मल्टीस्टेटच्या संचालकासह कर्मचाऱ्यावर भादवी ४२०,४६७,४६८,४७१ व कलम ३व ४ एम पी आय डी कायदा १९९९अन्वये गुन्हे नोंदवण्याबाबत मागणी केली होती त्यावर शिवकांता तोडकरी, दिनकर हांगे, दत्तात्रय पारडकर, आशाबाई पारडकर ,चतुराबाई पारडकर या फिर्यादींच्या प्रकरणात मा. पहिले सत्र न्यायाधीश अली एस.ए.एस.एम.यांच्या न्यायालयात ॲड. नारायण गोले पाटील यांनी युक्तिवाद केल्यानंतर ज्ञानराधा मल्टीस्टेटच्या संचालकासह कर्मचाऱ्यावर फौजदारी प्रक्रिया संहीता कलम १५६(३)अन्वये गुन्हा दाखल करुण तपास करणेबाबत आदेश मा.सत्र न्यायाधीश अली एस.ए.एस. एम.यांनी दि.२९ एप्रिल रोजी पोलीस निरिक्षक पोलीस स्टेशन माजलगाव शहर यांना दिला आहे.

## पान ६ वरून...

### पुरुषांच्या हक्कासाठी

विधानसभा निवडणूक लढले आहेत. पण कोठेही त्यांना यश मिळाले नाही.

महिला सुरक्षेच्या नावाखाली अनेक पुरुषांचा मानसिक छळ होतो त्याबाबत आवाज उठविण्याचे काम आम्ही करणार आहोत. आमच्यासाठी जय आणि पराजय गोष्टी फारशा महत्त्वाच्या नाहीत. यावेळेस देखील आमचे अनेक उमेदवार डिपॉझिट गमावतील अशी स्थिती आहे असे राष्ट्रीय सरचिटणीस आशुतोषकुमार पांडे यांनी म्हटले आहे. लोकसंख्येतील अर्धा घटक असणा-या पुरुषांना न्याय देण्याचे काम आम्ही करत आहोत. आम्ही मांडत असलेल्या समस्यांकडे लोकांचे लक्ष जावे या उद्देशानेच आम्ही ही निवडणूक लढत आहोत असे राष्ट्रीय अध्यक्ष कपिल मोहन यांनी म्हटले.

### रायबरेली आणि अमेठीत

गांधी यांनी राजस्थानमधून राज्यसभेची निवडणूक लढवल्यानंतर रायबरेलीमध्ये त्यांच्या जागी कोण निवडणूक लढवणार याची चर्चा रंगली होती. मात्र त्यांची जागा कोण घेणार हे अद्याप स्पष्ट झालेले नाही. प्रियंका गांधी यांना रायबरेलीतून रिंगणात उतरवण्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. मात्र प्रियंका गांधी यांनीही नकार दिल्याचे बोलल्या जात आहे. अमेठी आणि रायबरेली या जागा काँग्रेसचा बालेकिल्ल्या मानल्या जात होत्या, पण २०१९ च्या निवडणुकीत स्मृती इराणींनी या जागेवर राहुल गांधींचा पराभव केला. राहुल गांधी केरळच्या वायनाडमधून लोकसभा निवडणूक लढवत आहेत आणि या जागेवरूनही ते उमेदवारी अर्ज दाखल करू शकतात असे मानले जात आहे. अमेठीमध्ये उमेदवारी दाखल करण्याची शेवटची तारीख तीन मे आहे. अमेठी मतदारसंघासाठी पाचव्या टप्प्यात २० मे रोजी मतदान होणार आहे. तर रायबरेलीच्या जागेवरही २० मे रोजी मतदान होणार आहे.

# मुलीने सासरीच रहावं असा सल्ला बजरंग सोनवणेंनी दिलाच कसा ?

## शरद पवारांच्या राष्ट्रवादीची भुमिका ? हा तर महिलांचा अपमान-प्रवक्ता राम कुलकर्णी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

आपल्या कुटुंबात सुन म्हणुन आलेली मुलगी बाहेरची असते असं म्हणत शरदचंद्र पवारांनी महिलांना हिणवल्यानंतर बीड लोकसभा मतदारसंघात महाविकास आघाडीच्या वतीने निवडणुक लढवणारे उमेदवार बजरंग सोनवणेंनी आपल्या नेतृत्वाचा कित्ता गिरवताना मुलीने सासरीच राहिलं पाहिजे असं म्हणत हा तर महिलांचा घनगोर अपमान केल्याची टिका भाजपाचे प्रदेश प्रवक्ते राम कुलकर्णी यांनी केली असुन त्यांच्या पक्षाचीही भुमिका अशाच प्रकारची राहिल्याचे ते म्हणाले.

प्रसिद्धीसाठी दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, बारामतीत राजकिय स्वार्थ साधण्यासाठी शरदचंद्र पवारांनी महायुतीच्या उमेदवार सुनेत्रा पवारांना बाहेरचे पवार म्हणत सुनेचा जाहिर अपमान केला. त्यावरूनच त्यांच्या पक्षाची महिलांच्या विषयी असलेली मानसिकता ओळखायला हवी. खरं तर वडिलधार्या भुमिकेत कुटुंबात वावरणार्या सासर्यांनी आपल्या सुनेची अशा प्रकारे अवहेलना करणं योग्य नाही. तोच कित्ता बीड लोकसभा मतदारसंघात निवडणुक लढवणारे बजरंग सोनवणे यांनी गिरवत महिलांनी सासरीच रहायला हवं असं म्हणत समस्त महिला, भगिनींचा अपमान केल्याची टिका कुलकर्णी यांनी केली. खरं तर पुरूषांनी अशा प्रकारे राजकिय स्वार्थापोटी महिला जगताची अवहेलना करणं हीच फार मोठी चुक असुन सामाजिक गुन्हा म्हणावा लागेल. बाप जेव्हा मुलीचं लग्न करून सासरी पाठवतो तेव्हा अधुनमधुन माहेरी येणं ही खर्या अर्थाने भारतीय रूढी, परंपरा, संस्कृती, आपलेपणाचं नातं आणि कुटुंब व्यवस्था मानवी उत्पत्तीपासुन चालत आली. शरद पवार राष्ट्रवादी गटाच्या अशा घाणेरड्या मानसिकतेमुळेच अलीकडे सर्वोच्च न्यायालयाने वडिलांच्या संपत्तीवर मुलीचा हक्क संविधानाने असतो आणि त्या प्रकारे एका प्रकरणात निकाल देताना कायदा देखील बनवला. मात्र करंटेपणा ज्या पुरूषाच्या अंगी भरलेला असतो अशी माणसं महिलांच्या बाबतीत अवहेलनात्मक भाषा का वापरतात? दुर्दैव असल्याचे त्यांनी म्हटले आहे. सोनवणे यांनी मुलींच्या बाबत केलेले वक्तव्य निषेधार्थ असुन आपणही एका मुलीचे बाप आहोत हे जर आत्मस्वरूपी परीक्षण करून पाहिलं तर मग त्यांना मुलीनं सासरीच राहिलं पाहिजे. या वाक्याचा पश्चाताप झाल्याशिवाय रहाणार नाही का? हा सवाल देखील राम कुलकर्णी यांनी केला.मुळात शरद पवार गटाची भुमिका महिलांच्या बाबतीत अशाच प्रकारची आहे का? ज्यामुळे सतत महिला जगताची अवहेलना केली जाते. याचा खुलासा पक्षाचे प्रदेश अध्यक्ष जयंतराव पाटलांनी करायला हवा असंही त्यांनी पत्रकात म्हटलं. बजरंग सोनवणे यांनी केलेल्या वक्तव्यानंतर बीड जिल्ह्यात महिला वर्गात प्रचंड संतापाची लाट पसरलेली असुन याचा फटका निश्चितच सोनवणे यांना निवडणुकीत बसु शकतो.

# २०२६ पर्यंत शेतकऱ्यांना ७,००० मेगावॅट सौर ऊर्जा उपलब्ध करणार

## महाराष्ट्राची योजना करणार मोठा बदल

पुणे : शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी २०२६ पर्यंत ७,००० मेगावॅट सौरऊर्जा निर्माण करण्याची राज्य सरकारची योजना आहे. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० मुळे उद्योगांसाठी वीज दरावर आकारण्यात येणाऱ्या क्रॉस-सबसिडीचा भार कमी होईल कारण सौर ऊर्जा सुमारे ३.३० रुपये प्रति युनिट दराने उपलब्ध होईल. यामुळे शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी २०२६ पर्यंत ७,००० मेगावॅट सौरऊर्जा निर्माण करण्याची राज्य सरकारची योजना आहे ज्यामुळे उद्योगांवरील क्रॉस-सबसिडीचा भार कमी होईल, असे महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी लिमिटेड ने सांगितले.

पत्रकार परिषदेला संबोधित करताना महावितरणचे स्वतंत्र संचालक विश्वास पाठक म्हणाले की, शेतकऱ्यांना आता रात्रीच्या वेळी सिंचनासाठी वीज मिळते आणि त्याचा त्रास होतो. मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० ( २.०) अंतर्गत, सरकार कृषी फीडरजवळ सौर पॅनेल बसवून दिवसा पुरवठा सुनिश्चित करेल, असे ते म्हणाले. यामुळे शेतकऱ्यांना दिवसा विश्वासार्ह वीज पुरवठा होईल. त्यांची अनेक



वर्षांपासूनची मागणी पूर्ण होईल असेही ते म्हणाले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी डिसेंबर २०२५ पर्यंत प्रत्येक जिल्ह्यातील किमान ३० टक्के कृषी फीडर सौरऊर्जेवर चालवण्याचे उद्दिष्ट ठेवून राज्यात एमएसकेव्हीवाय २.० लागू करण्याचा निर्णय घेतला आहे.

२.० अंतर्गत ३०,००० रुपये कोटींची गुंतवणूक केली जाईल. २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे महावितरणचे उद्दिष्ट असलेल्या या प्रकल्पामुळे हजारो रोजगार निर्माण होतील, असा दावा त्यांनी केला. सौर पॅनेल बसवण्यासाठी सरकारी जमीन वापरण्याव्यतिरिक्त, महावितरण खाजगी जमीन भाडेतत्त्वावर देखील घेणार आहे, ज्यामुळे शेतकऱ्यांना प्रति हेक्टर १.२५ लाख रुपये वार्षिक भाडे मिळवण्याची संधी मिळेल.


२.० अंतर्गत, ने १,५१३ निर्मितीसाठी करार केले आहेत ज्यापैकी ५५३ सौर उर्जा निर्माण करण्यास सक्षम कार्ये आधीच कार्यान्वित झाली आहेत. सुमारे १ लाख शेतकरी २३० कृषी फिडरद्वारे दिवसा वीज घेत आहेत. महावितरण कंपनी सरासरी ८.५ रुपये प्रति युनिट दराने वीज खरेदी करते, परंतु शेतकऱ्यांना १.५ रुपये प्रति युनिट दराने वीजपुरवठा केला जातो, तर उद्योगांसाठी वीज दरावर आकारल्या जाणार्या क्रॉस-सबसिडीद्वारे विभेदक खर्च वसूल केला जातो, असे ते म्हणाले. सौरऊर्जेद्वारे मिळणारी वीज सुमारे ३.३० रुपये प्रति युनिट दराने उपलब्ध होणार असल्याने, भविष्यात उद्योगांवरील क्रॉस-सबसिडीचा भार कमी होईल.

## निळवंडेचे पाणी सोडा, अन्यथा रास्ता रोको : आमदार तनपुरे

पुणे : निळवंडे धरणाच्या उजव्या कालव्याचे हक्काचे शिल्लक एक टीएमसी पाणी एक मे पर्यंत सोडावे. अन्यथा, लाभधारक शेतकऱ्यांसह रास्ता रोको आंदोलन करून सविनय कायदेभंग केला जाईल. त्यास भाग पाडणारे जलसंपदाचे अधिकारी आंदोलनास जबाबदार असतील, असा इशारा आमदार प्राजक्त तनपुरे यांनी दिला.

राहुरी येथे तनपुरे यांनी लाभधारक शेतकऱ्यांसह तहसीलदारांची भेट घेऊन मागणी मांडली. निळवंडे धरणाचे अधीक्षक अभियंता यांच्याशी संपर्क साधून तनपुरे यांनी अंदोलनाचा इशारा दिला. निळवंडेतून प्रवरा नदीपात्रात पाणी सोडले. परंतु, उजव्या कालव्याचे पाणी सोडले नाही. त्यामुळे लाभधारक शेतकरी संतप्त झाले होते. तनपुरे म्हणाले, की निळवंडे डाव्या कालव्याची चाचणी अगोदर झाली. त्या वेळी अडीच टीएमसी पाणी वापरले गेले. कालवा सल्लागार समितीच्या बैठकीत उजव्या कालव्याच्या चाचणीसाठी दीड टीएमसी पाणी राखीव ठेवावे, अशी मी मागणी केली होती. त्यानुसार ठराव करण्यात आला. त्यानंतर उजव्या कालव्याची चाचणी करताना फक्त अर्धा टीएमसी पाणी वापरण्यात आले. तांत्रिक दोष दुरुस्तीच्या कामासाठी अवघ्या चार दिवसांत उजव्या कालव्याचे पाणी बंद करण्यात आले. त्यानंतर पाटबंधारेच्या अधिकाऱ्यांनी २५ एप्रिलपर्यंत शिल्लक एक टीएमसी पाणी सोडले जाईल, असे आश्वासन दिले. परंतु, आजपर्यंत पाणी सोडण्यासाठी कोणत्याही हालचाली केल्या नाहीत. या वेळी निळवंडेच्या लाभक्षेत्रातील शेतकरी उपस्थित होते.

आता निळवंडेच्या अधिकाऱ्यांनी १५ मे नंतर उजव्या कालव्याचे पाणी सोडू, असे सांगितले. लोकसभा निवडणूक झाल्यावर पाणी सोडणार म्हणजे त्यामागे राजकीय वास असल्याचे दिसते. राहुरी तालुक्यातील निळवंडेच्या लाभक्षेत्रातील निभेंरे, तुळापूर, कानडगाव, तांदूळनेर, वडनेर, कणगर, चिंचविहिरे येथे जनावरांच्या व माणसांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. त्यामुळे तत्काळ पाणी सोडावे. अन्यथा, रास्ता रोकोचा इशारा दिला आहे, असे तनपुरे म्हणाले.



## क्षारयुक्त पाणी शेतीसाठी वापरतांना घ्या काळजी



शेतीसाठी क्षारयुक्त पाण्याचा वापर करतांना प्रत्येक पाळीच्या वेळी पाण्यावाटे जमिनीत क्षार टाकले जातात. जमिनीस दिलेले पाणी बाष्पीभवनाद्वारे निघून जाते. जमिनीचा निचरा बरोबर नसल्यास हे क्षार जमिनीच्या बाहेर किंवा जमिनित खोलवर जाऊ शकत नाही. अशा रीतीने जमिनीच्या वरच्या थरात क्षारांचे प्रमाण वाढत जाते आणि जमिनी क्षारयुक्त बनतात. क्षारयुक्त पाण्यात सोडियमचे प्रमाण जास्त असल्यास आणि पिकाखालील जमिनीत चुन्याचे प्रमाण कमी असल्यास जमिनी चोपण बनतात, म्हणजे त्या जमिनीतील सोडीयमचे प्रमाण वाढून तिचे प्राकृतिक गुणधर्म बिघडतात. त्यामुळे जमिनीचा सामू वाढून तिच्यातील अन्नद्रव्यांची उपलब्धतता कमी होते. आणि जमिनीची उत्पादनक्षमता खालावते.

क्षारास प्रतिकार करणारी पिके : कापूस, ताग, धौचा, शुगरबीट, ओट, पालक, घास, खजूर, बार्ली, नारळ, पेरू, निलगिरी, चिकू.

मध्यम प्रतिकार करणारी पिके : गहू, ज्वारी, बाजरी, मका, ऊस, सूर्यफुल, सोयाबीन, भुईमुग, अंजीर, बोर, डाळिंब, पपई, द्राक्ष, कलिंगड, आंबा, केळी, टोमॅटो, गाजर, काकडी, भोपळा, कांदा, बटाटा, लसूण.


क्षारयुक्त पाण्याचा वापर करतांना घ्यावयाची काळजी : जमिनीला साधारणतः उतारा द्या. उताराच्या दिशेने खोल नांगरट करा.

शेतात उताराच्या दिशेने योग्य मशागत करा. पिकाची लागवड सरीच्या बगलेत करा. पिकांमध्ये नियमित वेळोवेळी उताराच्या दिशेने आंतरमशागत करा. सेंद्रीय खतांचा तसेच हिरवळीच्या खतांचा जास्त प्रमाणात वापर करा. रासायनिक खतांमध्ये नत्रयुक्त खतांचा शिफारशीपेक्षा २५ टक्के जास्त वापर करा. सरीमध्ये पाचटांसारखे आच्छादन टाका. पिकांना वारंवार परंतु मर्यादित पाणी द्या. पाण्याचे पाणी उपलब्ध असल्यास खारवट पाण्यात ते ठराविक प्रमाणत मिसळू द्या. एक आड एक सरी भिजवा. ठिबक सिंचन वापर, विद्राव्य क्षारांची मात्रा २ डेसीसायमन प्रति मीटरपेक्षा कमी असल्यास करावा. क्षार सहनशील पिकांची निवड करावी. उदा. गहू, ज्वारी, ऊस, मका. सूर्यफुल, कापूस, शुगरबीट, ई. पाणी जास्त क्षारयुक्त असेल तर निलगिरी, बांबू, सुबाभूळ इत्यादिंची वृक्षशेती करावी. पाणी तपासणीसाठी नमुना कोठे पाठवाल? : महाराष्ट्र शासनाच्या कृषि विभागातर्फे, प्रत्येक जिल्ह्यात मृद सर्वेक्षण मृद चाचणी प्रयोगशाळा अस्तित्वात आहेत, तसेच राज्यातील चारही कृषि विद्यापीठाच्या कार्य क्षेत्रातील काही संशोधन केंद्रांवर तसेच राज्यातील काही कृषि विज्ञान केंद्रे;साखर कारखाने; खासगी खत कंपन्या येथे मातीपाणी परिक्षणाची सुविधा शुल्कासह केली जाते.

## मासेपालनासाठी शेणाचा असा करा वापर

शेतीसोबतच शेतकरी मत्स्यपालन मोठ्या प्रमाणावर करतात. यातून शेतकऱ्यांना चांगले उत्पन्न मिळते. याशिवाय मत्स्यपालनासाठी सरकारकडून शेतकऱ्यांना आर्थिक मदतही केली जाते. काहीवेळा शेतकऱ्यांना मत्स्यपालनाशी संबंधित फारशी माहिती नसल्याने मत्स्यपालनात नुकसान सहन करावे लागते. त्यामुळे आज आपण मत्स्यपालनाशी संबंधित अशा तंत्रांबद्दल जाणून घेणार आहोत. ज्याचा अवलंब करून मत्स्यपालनातून चांगले उत्पादन मिळवू शकतात.

मत्स्यपालनासाठी तलावाची खोली पाच ते सहा फूट असावी जेणेकरून माशांची वाढ झपाट्याने होईल. पाच ते सहा फूट खोल तलावामध्ये सूर्यकिरण प्लँक्टन उचलतात आणि तलावाच्या पृष्ठभागावर पोहोचतात. त्यामुळे तलावाच्या खोलीपर्यंत प्लँक्टन आढळून येतो. विशेष म्हणजे पाण्याच्या वेगवेगळ्या पातळ्यांवर प्लवकांचे प्रमाणही वेगवेगळे असते. वरच्या स्तरावर जास्त प्रकाश पडल्यामुळे एकूण प्लवकांपैकी सुमारे ६० टक्के येथे उपस्थित आहे. तर तलावाच्या मधल्या आणि खालच्या पातळीवर २० टक्के प्लँक्टन उपलब्ध आहे. यामुळे सर्व मासे वेगवेगळ्या स्तरावर अन्न शोधतात. संमिश्र मत्स्यपालन वापरा : कॉमन कॉर्प



आणि कतला वरच्या आणि मध्यम स्तरावर अन्न शोधतात. तर सिल्व्हर कॉर्प आणि नॅनी खालच्या स्तरावर जेवण करतात. म्हणून संपूर्ण तलावाचे विविध स्तरांवर शोषण करण्यासाठी संमिश्र मत्स्यसंवर्धनाचा वापर केला पाहिजे. विशेषत: मत्स्य शेतकरी तलावात मस्त्य फीड किंवा धान्य टाकतात मात्र पैशाअभावी त्यांना योग्य प्रमाणात चारा मिळत नाही. त्यामुळे माशांची वाढ वेगाने होत नाही. अशा स्थितीत मत्स्य उत्पादकांना फारसा फायदा मिळत नाही.

शेणामुळे माशांचे वजन वाढेल : जर शेतकऱ्यांकडे माशांचे खाद्य खरेदी करण्यासाठी पैसे नसतील तर ते स्वत: घरी माशांचे खाद्य तयार करू शकतात. यासाठी शेतकरी गाई-म्हशींच्या शेणाचाही वापर करू शकतात. गाईच्या शेणावरही मासे जगू शकतात. शेतकरी थेट तलावात शेण टाकू शकतात. याशिवाय शेळीची विष्ठाही वापरता येते. शेळीची विष्ठा पावडरमध्ये बारीक करून तळ्यात मिसळा, जे चारा म्हणून काम करेल. शेळीची विष्ठा पाण्यात सहज विरघळते, त्यामुळे मासे ते सहज खाऊ शकतात.

सुरुवातीला २ हजार किलो शेण टाका : भारतीय कृषी संशोधन परिषदेने (आयसीएआर) केलेल्या संशोधनात हे सिद्ध झाले आहे की, शेणात असलेले घटक खाल्ल्याने मासे जलद वाढतात.

यामुळेच आयसीएआरने माशांसाठी ग्लोबल गोळ्याही बनवल्या आहेत. याचे कारण म्हणजे शेणात नायट्रोजन मोठ्या प्रमाणात आढळतो आणि मासे ते खातात तेव्हा त्यांचे वजन झपाट्याने वाढते. एक हेक्टरमध्ये मत्स्यशेती सुरू केल्यास प्रथम तलावात २ हजार किलो शेण घाला आणि त्यानंतर दरमहा १ हजार किलो शेण घाला. त्यामुळे माशांचे वजन झपाट्याने वाढेल आणि तुमचे उत्पन्नही वाढेल.




### महत्वाच्या घटना

१७०७ : किंगडम ऑफ इंग्लंड व किंगडम ऑफ स्कॉटलंड मिळून किंगडम ऑफ ग्रेट ब्रिटन बनवण्यात आले.
१७३९ : चिमाजीअप्पांनी सैन्यासह वसईवर हल्ला केला.
१८४० : द पेनी ब्लॅक हे पहीले अधिकृत पोस्टेज स्टॅम्प युनायटेड किंगडममध्ये जारी केले गेले.
१८४४ : हाँगकाँग पोलिस फोर्स हे जगातील दुसरे आणि आशियातील पहिले आधुनिक पोलिस दल स्थापन झाले.
१८६२ : मुंबई विद्यापिठाचा पहिला पदवीदान समारंभ.
१८८२ : आर्य महिला समाजा ची पं. रमाबाई यांच्या पुढाकाराने पुणे येथे स्थापना झाली.
१८८४ : अमेरिकेत कामगारांना एका दिवसात ८ तास कामकाज असावे ह्या मागणीची घोषणा.
१८८६ : या दिवशी अमेरिकेत आठ तासाचे काम हे एक दिवसाचे काम असे प्रमाणित करण्यासाठी संप सुरू झाला. हा दिवस जगभर (अमेरिका सोडून) कामगार दिन म्हणून पाळला जातो.
१८९० : जागतिक कामगार दिन हा जगात पहिल्यांदा साजरा केला.
१८९७ : स्वामी विवेकानंद यांनी रामकृष्ण मिशन या संस्थेची स्थापना
१९२७ : जागतिक कामगार दिन हा भारतात पहिल्यांदा साजरा केला.
१९३० : सूर्यमालेतील नवव्या ग्रहाचे प्लुटो असे नामकरण करण्यात आले.
१९४० : युद्ध सुरू असल्यामुळे ऑलिम्पिक स्पर्धा रद्द करण्यात आल्या.
१९५६ : पोलियोची लस जनतेस उपलब्ध.
१९६० : द्वैभाषिक मुंबई राज्याचे विभाजन होऊन महाराष्ट्र आणि गुजरात ही दोन राज्ये निर्माण केली गेली.
१९६० : गुजरात उच्च न्यायालयाची स्थापना झाली.
१९६१ : क्युबाचे पंतप्रधान फिदेल कॅस्ट्रो यांनी क्यूबा देश समाजवादी राष्ट्र घोषित करून निवडणुका रद्द केल्या.
१९६२ : महाराष्ट्रातील जिल्हा परिषदांची स्थापना.
१९७२ : कोळसा खाणीचे राष्ट्रीतीकरण करण्यात आले.
१९७८ : जपान चे नामी उमुरा हे एकटे उत्तर ध्रुवावर पोहोचणारे पहिले मनुष्य आहेत.
१९८१ : सिंधुदुर्ग जिल्ह्याची निर्मिती
१९८३ : अमरावती विद्यापीठाची स्थापना झाली.
१९९८ : पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या हस्ते कोकण रेल्वे प्रकल्प राष्ट्राला अर्पण करण्यात आला.
१९९९ : नगरपालिकांच्या नगराध्यक्षांची मुदत एक वर्षावरून अडीच वर्षांपर्यंत वाढवण्यासाठी सुधारणा करणारा अध्यादेश जारी झाला.
२००९ : स्वीडन मध्ये समलिंगी विवाह अधिकृत करण्यात आला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१२१८ : जर्मनीचा राजा रुडॉल्फ (पहिला) यांचा जन्म. (मृत्यू: १५ जुलै १२९१)
१९१० : आय.सी.एस चे वरिष्ठ अधिकारी तसचं, भारतातील केरळ आणि मध्य प्रदेश राज्याचे माजी राज्यपाल निरंजन नाथ वांचू यांचा जन्मदिन.
१९१३ : अभिनेता बलराज साहनी यांचा जन्म. (मृत्यू: १३ एप्रिल १९७३)
१९१५ : 'अंचल' रामेश्वर शुक्ल, आधुनिक हिंदी कवी
१९१९ : भारतीय भाषेतील प्रतिभासंपन्न पार्श्वगायक मन्ना डे यांचा जन्म. (मृत्यू: २४ ऑक्टोबर २०१३)
१९२० : मन्ना डे, हिंदी आणि वंग चित्रपटसृष्टीतील गायक
१९२२ : स्वातंत्र्यसैनिक, पत्रकार आणि समाजवादी नेते मधु लिमये यांचा जन्म. (मृत्यू: ८ जानेवारी १९९५)
१९३२ : कर्नाटकचे १६ वे मुख्यमंत्री आणि केंद्रीय परराष्ट्रमंत्री एस. एम. कृष्णा यांचा जन्म.
१९४३ : नृत्यांगना सोनल मानसिंह यांचा जन्म.
१९४४ : सुरेश कलमाडी, भारतीय राजकारणी.
१९७१ : भारतीय अभिनेते आणि रेस कार ड्रायव्हर अजित कुमार यांचा जन्म.
१९८८ : साली सुप्रसिद्ध भारतीय हिंदी चित्रपट अभिनेत्या व हिंदी चित्रपट निर्माता अनुष्का शर्मा यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८८८ : ब्रिटीश कालीन भारतातील स्वातंत्र्य सेनानी प्रफुलचंद्र चाकी यांचे निधन.
१९४५ : जर्मनीचा चॅन्सेलर नाझी नेता जोसेफ गोबेल्स यांचे निधन. (जन्म: २९ ऑक्टोबर १८९७)
१९५८ : नाटककार गणेश शिवराम उर्फ नाना जोग यांचे नागपुर येथे निधन.
१९७२ : कमलनयन बजाज, भारतीय उद्योगपती.
१९९३ : नानासाहेब गोरे उर्फ ना. ग. गोरे, समाजवादी विचारवंत.
१९९८ : गंगुताई पटवर्धन, शिक्षणतज्ञ.
२००२ : पंडित आवळीकर, मराठी वाङ्मयाचे अभ्यासक.
२००४ : भारतीय जनता पार्टी तसेच पूर्ववर्ती पक्ष भारतीय जनता संघाचे नेते तसचं, उत्तर प्रदेश राज्याचे माजी मुख्यमंत्री आणि मध्यप्रदेश राज्याचे माजी राज्यपाल यांचे निधन.
२००८ : पद्मविभूषण पुरस्कार सन्मानित प्रख्यात भारतीय सामाजिक कार्यकर्त्या व महात्मा गांधी यांच्या तत्वज्ञानी निर्मला देशपांडे यांचे निधन.
२०१३ : निखील एकनाथ खडसे यांचे निधन.

## थोडक्यात

### पालकमंत्री यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण

बीड : महाराष्ट्र दिनाच्या ६५ व्या वर्धापन दिनानिमित्त बुधवार दि. १ मे २०२४ रोजी बीड येथील पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर सकाळी ८ वाजता कृषी मंत्री तथा पालकमंत्री बीड धनंजय मुंडे यांच्या शुभहस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण समारंभ होणार आहे. याच बरोबर जिल्ह्यात विविध ठिकाणी ध्वजारोहण केले जाणार असून, जिल्हाधिकारी कार्यालयातील ध्वजारोहण जिल्हाधिकारी दिपा मुधोळ-मुंडे यांच्या हस्ते १ मे रोजी सकाळी ७.१५ वाजता होणार आहे. तसेच मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीमधील ध्वजारोहणाचा कार्यक्रम अप्पर जिल्हाधिकारी, बीड, त्रिगुण कुलकर्णी यांच्या हस्ते सकाळी ७.०० वाजता संपन्न होणार असून दोन्हीही ध्वजारोहण समारंभ संपल्यानंतर अधिकारी व कर्मचारी यांनी जिल्हा पोलीस मुख्यालय मैदान, बीड येथील ध्वजारोहणाच्या मुख्य शासकीय समारंभास सकाळी ७.४५ पूर्वी शासकीय गणवेषात उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी कार्यालयाकडून परिपत्रकाव्दारे करण्यात आले आहे.

### महाराष्ट्र दिनाच्यानिमित्त आज ध्वजारोहण

बीड : महाराष्ट्र दिनाच्या ६५ व्या वर्धापन दिनानिमित्त आज (बुधवार) पोलीस मुख्यालयाच्या ठिकाणी सकाळी ८ वाजता राज्याचे कृषी मंत्री तथा जिल्हयाचे पालक मंत्री धनंजय मुंडे यांच्या हस्ते जिल्हा पोलीस मुख्यालयाच्या ठिकाणी ध्वजारोहण करणार आहेत. यासह जिल्हाधिकारी दिपा मुधोळ-मुंडे यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालयात सकाळी ७.१५ वाजता होणार आहे. तसेच मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीमधील ध्वजारोहणाचा कार्यक्रम अपर जिल्हाधिकारी डॉ. त्रिगुण कुलकर्णी यांच्या हस्ते सकाळी ७.०० वाजता संपन्न होणार आहे.

### प्रवासी महिलेचे पर्समधील गंठण लांबविले

केज : मस्साजोग (ता. केज) येथे बसमधून उतरत असलेल्या एका महिलेचे पर्समधील २० हजार रुपये किंमतीचे गंठण लांबविले. याप्रकरणी दोन महिलांविरुद्ध केज पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे. विडा (ता. केज) येथील कांचन चंद्रकांत कुलकर्णी (वय ४८) या नोकरी करीत असून त्या २८ एप्रिल रोजी दुपारी अंबाजोगाई येथून बसने गावाकडे जाण्यासाठी आल्या होत्या. सायंकाळी ६ ते ६.३० वाजेच्या दरम्यान मस्साजोग येथील बसस्थानकावर बसमधून उतरत असताना दोन बुरखाधारी महिलांनी गर्दी करीत कांचन कुलकर्णी यांच्या पर्समधील २० हजार रुपये किंमतीचे २८ ग्रॅमचे जुने सोन्याचे गंठण पर्सची चैन खोलून लंपास केले. २९ एप्रिल रोजी दुपारी कांचन कुलकर्णी यांनी दिलेल्या तक्रारीवरून अनोळखी दोन महिलांविरुद्ध केज पोलिसात चोरीचा गुन्हा दाखल झाला आहे. पोलीस नाईक राजू गुंजाळ हे तपास करीत आहेत.

### अल्पवयीन मुलीचे अपहरण, अज्ञात व्यक्तीवर गुन्हा

केज : आजोळी आईसोबत वास्तव्यास असलेल्या एका अल्पवयीन मुलीचे अज्ञात व्यक्तीने फुस लावून पळवून नेत अपहरण केल्याची घटना केज तालुक्यातील एका गावात घडली. कळंब (जि. धाराशिव) तालुक्यातील एक महिला ही पतीसोबत पटत नसल्याने मागील दहा वर्षापासून आपल्या मुलीसह माहेरी केज तालुक्यातील एका गावात वास्तव्यास आहे. ही महिला आजारी असल्याने २८ एप्रिल रोजी दुपारी २ वाजता जेवण व गोळ्या घेऊन शेतात झोपली होती. तर तिची आई चटणी कुटण्यासाठी बाहेर गेली. तर घरी या महिलेची इयत्ता ११ वीच्या वर्गात शिक्षण घेत असलेली अल्पवयीन मुलगी एकटीच होती. ती एकटी असल्याची संधी साधून अज्ञात व्यक्तीने पळवून नेत अपहरण केले. तिचा शोध घेतला, तर तिचा तपास न लागल्याने तिच्या मोबाईलवर फोन केला. मात्र तिने फोन उचलला नाही. महिलेच्या तक्रारीवरून अज्ञात व्यक्तिविरुद्ध केज पोलिसात अपहरणाचा गुन्हा दाखल झाला आहे. जमादार दत्तात्रय बिक्कड हे तपास करताहेत.

### समाजवादीच्या जिल्हाध्यक्षपदी खमरुल इमान खान

बीड : बीड जिल्ह्यात समाजकारणात नेहमी अग्रेसर असणारे पत्रकार खमरुल इमान खान यांच्या कार्याची दखल घेत समाजवादी पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आमदार अबु असीम आझमी यांच्या सुचनेवरुन खमरुल इमान खान यांची समाजवादी पार्टीच्या बीड जिल्हाध्यक्षपदी निवड करण्यात आली. दि.२९ एप्रिल २०२४ रोजी नांदेड येथे झालेल्या बैठकीत प्रदेश कार्याध्यक्ष प्रताप होगळे, महासचिव परवेज सिद्दीकी, मोहम्मद रऊफ, डॉ.जोशी पाटोदकर यांच्या उपस्थितीत त्यांना नियुक्तीपत्र देऊन पुढील कार्यास शुभेच्छा देण्यात आली. खमरुल इमान खान यांची निवड झाल्याबद्दल मुश्ताक अन्सारी, अब्दुल वकील सर, फैसल बेग, रेहान सिद्दीकी, मिर्झा वसीम बेग, सुलतान बाबा, मिर्झा रुहतुल्लाह बेग, आसेफ खान, फयाज कुरेशी, नाजेर कुरेशी, आमेर खान आदींनी शुभेच्छा दिल्या आहेत.

### डॉक्टर व कर्मचाऱ्यांना शिवीगाळ

केज : दुचाकीवरून पडून जखमी झालेल्या रुग्णास उपचारासाठी घेऊन आलेल्या चौघा नातेवाईकांनी केज येथील उपजिल्हा रुग्णालयात महिला डॉक्टरशी हुज्जत व गोंधळ घालत त्यांना व त्यांच्या सोबतच्या कर्मचाऱ्यांना शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी देत सरकारी कामात अडथळा केला. याप्रकरणी चौघांविरुद्ध केज पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे. केज येथील उपजिल्हा रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. आयशा मुस्ताक अन्सारी (वय २८) या २८ एप्रिल रोजी अपघात विभागात कर्तव्यावर होत्या. सायंकाळी ६.३५ वाजेच्या सुमारास दत्ता सदाशिव क्षीरसागर (वय ३७, रा. सारणी / सांगवी ता. केज ) हे दुचाकीवर पडून जखमी झाल्याने त्यांना उपचारासाठी त्यांचे चार नातेवाईक त्यांना घेऊन आले. त्यांनी जखमी दत्ता क्षीरसागर याच्या डोक्याला व जीभेला मार लागल्याने तुम्ही टाके का घेईनात असे कारण काढून डॉ. आयशा अन्सारी यांच्याशी वाद घालून त्या सरकारी काम करीत असतांना त्यांचे सरकारी कामात अडथळा केला. त्यांना व त्यांच्या सोबत कर्तव्यावर असलेल्या कर्मचाऱ्यांना शिवीगाळ केली. तर डॉ. आयशा यांना तु रुग्णालयामध्ये नौकरी कशी काय करते ? असे म्हणून मारण्याची धमकी देत रुग्णालयात गोंधळ केला. अशी तक्रार डॉ. आयशा अन्सारी यांनी दिल्यावरून दत्ता क्षीरसागर यांच्यासोबत असलेल्या चार अनोळखी नातेवाईकांविरुद्ध केज पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे. सहाय्यक फौजदार बालासाहेब रोडे हे तपास करताहेत.

# कुस्त्यांची परंपरा लोप पावत चालली आहे - जयदत्त क्षीरसागर

राजुरी । प्रतिनिधी

मैदानी आणि मर्दानी खेळ डोळ्याचे पारणे फेडणारे असून अनेक गावच्या कुस्त्यांची परंपरा लोप पावत चालली आहे असे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले.नवगण राजुरी येथे प्रतिवर्षा प्रमाणे याही वर्षी सय्यद जानपीर उर्स निमित्त शनिवार दि.२७ रोजी संदल आणि भव्य मिरवणूक काढण्यात आली व दि.२८ रोजी ताजी यात्रा आणि सोमवार दि.२९ रोजी जंगी कुस्त्यांचे सामने संपन्न झाले. यावेळी जिल्ह्यातील कुस्तीगिर मल्लांनी हजेरी लावून लहान मोठ्या कुस्त्यांचे सामने झाले. कुस्ती विजेत्या मल्लांना बक्षीस देण्यात आले. याप्रसंगी रविंद्र क्षीरसागर, अरूण डाके, सुधाकर मिसाळ, हेमंत क्षीरसागर, बाळू आवारे यांची प्रमुख उपस्थिती होती.



यावेळी पुढे बोलताना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर म्हणाले की, गेल्या अनेक वर्षापासूनची नवगण राजुरीच्या कुस्त्यांची परंपरा आहे. नानांच्या काळात नवगण राजुरीत जिल्ह्यात नंबर १ कुस्त्या असायच्या. कुस्त्यांचा फड रंगत आणि खरी कुस्ती काय होती हे आम्ही बालपणी पहायचो. पुर्वीपासून काळ्या मातीचा फड जागवला आहे. ही परंपरा भविष्यात कायम रहावी. या कुस्त्यांच्या हंगामाला पुर्वी राज्यातून पैलवान यायचे आणि या स्पर्धा पहायला परिसरातून लोक येत होते. अनेक गावात कुस्त्यांची परंपरा होती, सध्या काही गावात ही परंपरा बंद होऊ लागली आहे असे त्यांनी सांगितले. या कुस्त्याचा फड जिल्ह्यातील नामांकित पैलवानांनी हजेरी लावून गाजवला.

## भीमसिंह महाराजांचे अध्यात्म व सामाजिक कार्यात मोठे योगदान- पुरी

बीड । प्रतिनिधी

भगवानगडाचे द्वितीय महंत वैकुंठवासी ह.भ.प. भीमसिंह महाराज यांनी अध्यात्म क्षेत्रात फार मोठे योगदान दिले. समाज सुधारण्याचे आणि अध्यात्म क्षेत्रातील त्यांचे कार्य फार मोठे आहे, असे प्रतिपादन ह.भ. प. रामानंद पुरी महाराज यांनी केले. शिरूर कासार तालुक्यातील पिंपळाची वाडी येथे वै. ह.भ.प. भीमसिंह महाराज यांच्या जन्मशताब्दी सोहळ्यानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या त्रिदिवशीय अखंड हरिनाम सप्ताहात ह.भ.प. रामानंद पुरी महाराज बोलत होते.



'याल तरी यारे लागे, आवघे माझ्या मागे मागे' या काला प्रकरणाच्या अभंगावर ह भ प रामानंद पुरी महाराज यांनी बहारदार विवेचन केले. भीमसिंह महाराज यांनी, बीड- नगर जिल्ह्यातील नव्हे तर महाराष्ट्रात वारकरी संप्रदायातील विद्यार्थी घडविण्याबरोबरच वारकरी संप्रदायाला मोठी उंची प्राप्त करून दिली. भीमसिंह महाराज यांच्या जन्माला १०० वर्षे झाल्यामुळे त्यांच्या जन्माचे स्वागत म्हणून या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या गावचे भाग्य आहे की, जन्मशताब्दी सोहळा साजरा करण्याचे आपल्याला भाग्य लाभले आहे. गावाने तन-मन-धनाने हा कार्यक्रम केल्याबद्दल त्यांनी गावकऱ्यांचे आभार मानले. याप्रसंगी कार्यक्रमास जनार्धन महाराज, कनोजे महाराज, भानुदास महाराज शास्त्री, नारायण महाराज ढिसले, माऊली सानप, माजी आमदार सुनील धांडे, पिंपळे सर, यांच्यासह टाळकरी गायनाचार्य मृदंगाचार्य परिसरातील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# धारूर शहरात दिव्यांग मतदार जनजागृती रॅली

धारुर । प्रतिनिधी

बीड लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर समाज कल्याण कार्यालय बीड यांच्या मार्गदर्शनाखाली धारूर येथील दिव्यांग विद्यालय कडून दिव्यांग मतदार जनजागृती अभियान ३० एप्रिल मुंगळवार रोजी धारूर तहसीलचे तहसीलदार जे के कांबळे यांच्या उपस्थितीमध्ये राबविण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने दिव्यांग विद्यालयातील मुख्याध्यापक, शिक्षक, कर्मचारी, अपंग विद्यार्थी तालुक्यातील दिव्यांग मतदार - नागरिक उपस्थित होते.





धारूर येथे बीड लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर समाज कल्याण कार्यालय बीड यांच्या मार्गदर्शनाखाली दिव्यांग मतदारांमध्ये जनजागृती करण्यासाठी धारूर येथील दिव्यांग विद्यालय यांनी ३० एप्रिल मंगळवार रोजी सकाळी साडेआठ वाजता रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. रॅली ची सुरुवात तहसील कार्यालय, काशिनाथ चौक, क्रांती चौक ,छत्रपती शिवाजी महाराज येथे विसर्जित करण्यात आली. यावेळी दिव्यांग मतदारांनी १३ मे रोजी होणाऱ्या लोकसभा निवडणुकीमध्ये जास्तीत जास्त दिव्यांग नागरिकांनी मतदानाचा हक्क बजावावा यासाठी रॅलीचे आयोजन करून नागरिकांना आव्हान केले. या रॅलीमध्ये ''उठ दिव्याग जागा हो लोकशाहीचा धागा हो'' या घोषवाक्य देऊन दिव्यांग मतदारांमध्ये जनजागृती केली. तसेच दिव्यांग विद्यालयातील शिक्षकांनी ग्रामीण भागात जाऊन मतदार बांधवांची भेट घेऊन मतदान करण्यासाठी आव्हान केले.यावेळी धारूर तहसीलचे तहसीलदार जे के कांबळे, वरिष्ठ लिपिक फरके, मतिमंद विद्यालयाचे मुख्याध्यापक संजीवन टोनगे, भालचंद्र मोरे, कानवटे, भुजबळ मॅडम,विलास गाढवे,रमेश साखरे दिव्यांग विद्यालयातील शिक्षक कर्मचारी शहरातील पत्रकार उपस्थित होते.

# नरदेहाची महत्ता लक्षात घेऊन मनुष्याने वागले तरच दु:ख कमी होईल-मातकर महाराज

बीड । प्रतिनिधी

मानव देह अत्यंतिक दुर्लभ आहे.अशा प्राप्त नरदेहाची महत्ता लक्षात घेऊनच मनुष्याचे वागले तरच जीवनातील दु:ख कमी होईल,असे प्रतिपादन श्री शिवाजी विद्यालय बीडचे पर्यवेक्षक व कीर्तनकार ह.भ.प.त्र्यंबक महाराज मातकर यांनी केले.ते बीड शहरातील राधाकृष्ण नगरी येथे हनुमान जन्मोत्सवाच्या निमित्ताने आयोजित अखंड हरिनाम सप्ताहात पाचव्या दिवसाच्या कीर्तन सेवेत बोलत होते. वै.गु.ज्ञानेश्वर माऊली चाकरवाडीकर यांच्या कृपाशीर्वादाने व वेदमूर्ती अविनाश महाराज ठोसर यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली गेल्या तीन वर्षांपासून हा अखंड हरिनाम सप्ताह सुरू आहे.पुढे बोलताना ते म्हणाले, की मानव देहरुपी साधन हेच भगवंत प्राप्तीचे एकमेव साधन आहे.हे साधन आता आपणास



प्राप्त झाले आहे.

गरज आहे भगवंताला शरण जाऊन भगवंत प्राप्तीच्या प्रबळ इच्छाशक्तीची.मनुष्य देहच देव प्राप्त करून देऊ शकतो.आणि मनुष्याचे अंतिम ध्येय देव प्राप्त करणे हेच असावे.जगद्गुरु संत श्री तुकाराम महाराज यांच्या, म्हणवोनी शरण जावे सर्व भावे देवासी या अभंगावर मंत्रमुग्ध करणारे निरूपण केले.मनुष्यानेच शरण का जावे? कोणाशी जावे? केव्हा जावे? शरण कसे जावे? आणि शरण गेल्यावर काय होईल? अशा विविध प्रश्नांचे अभंगाला अनुसरून सखोल, सप्रमाण चिंतन मांडले. कीर्तनाला दैनिक रिपोर्टरचे उपसंपादक व अखिल भारतीय वारकरी महामंडळाचे प्रसिद्धी प्रमुख अनंतराव घिगे, काकडा भजन गायक ह.भ.प.सुभाष महाराज तौर, युवा कीर्तनकार ह.भ.प.श्रीकृष्ण महाराज उबाळे, चंपावती विद्यालयाचे जेष्ठ शिक्षक, ,संगीत विशारद ह.भ.प. दीपक महाराज बिल्पे, ह.भ.प. राजेन्द्र देवकर यांची उपस्थिती होती. संगीतसाथ गायनाचार्य सुरेश महाराज पांचाळ, दत्तात्रय महाराज बहीर, वैजिनाथ महाराज मार्कड, उद्धव महाराज भुसारे, मृदंगाचार्य प्रवीण महाराज कणसे, वाल्मिक महाराज चाटे यांच्यासह राधाकृष्ण नगरी व परिसरातील शेकडो भाविक कीर्तनासाठी उपस्थित होते.

## माळेगाव शाळेचा वार्षिक ऑनलाईन निकाल

माळेगाव । प्रतिनिधी

दरवर्षी महाराष्ट्र दिनी (१मे) जिल्हा परिषद शाळेचा निकाल जाहीर करण्यात येतो.या दिवशी विद्यार्थी पालकांनाही निकालाची उत्सुकता लागलेली असते. केज तालुक्यातील माळेगाव येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांना व पालकांना निकाल आता ऑनलाईन घरबसल्या पाहता येणार आहे.

शाळेचे तंत्रस्नेही शिक्षक सचिन क्षिरसागर व विश्वनाथ बेद्रे यांनी सीसीई सॉफ्टवेअर विकसित करुन शाळेचे सर्व रेकॉर्ड गुणपत्रकासह डिजिटल माध्यमातून तयार केलेले आहे. शाळेचा यु-डायस कोड इयत्ता व त्यांच्या पाल्यांचा जन्म दिनांक टाकून निकाल घरबसल्या मोबाईलवर पाहता येणार आहे. शाळेचे गुणपत्रे व इतर माहिती सॉफ्टवेअरच्या माध्यमातून पूर्ण करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक भोसले तुकाराम सह शिक्षक ठोंबरे,पाळवदे ,चौधरी व काळे यांचे सहकार्य लाभलेले आहे. केज तालुक्यात प्रथमच ऑनलाईन निकाल घोषित करण्याचा मान माळेगाव येथील जी प शाळेला मिळाला आहे. शाळेच्या या नाविन्यपूर्ण उपक्रमाबद्दल केज तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर ,विस्ताराधिकारी सुनील केंद्रे ,साळेगाव केंद्राचे केंद्रप्रमुख अंकुशे अभिनंदन केले आहे.

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज समाजहितासाठी चंदनासारखे झिजले-प्रा. मुळे

बीड । प्रतिनिधी

स्वा. सावरकर माध्यमिक विद्यालयात आज राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली.याप्रसंगी संस्थेचे प्रशासकीय अधिकारी मा. चंद्रकांतजी मुळे यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात सांगितले की, अंधश्रद्धा व जातिभेदाच्या निर्मूलनासाठी तुकडोजी महाराजांनी भजनं आणि कीर्तनाचा प्रभावीपणे वापर करून समाजप्रबोधन केले. समाजप्रबोधनासाठी महाराष्ट्राभरच नव्हे तर देशभर हिंडून आध्यात्मिक, सामाजिक व राष्ट्रीय एकात्मतेचे धडे देणा-या राष्ट्रसंतांचे अख्खे आयुष्य चंदनासारखे झिजले. त्यांच्या कार्याचे स्मरण सदैव ठेवणे ही काळाची गरज आहे. असे प्रतिपादन प्रा. मुळे यांनी केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी प्रशासकीय अधिकारी प्रा. चंद्रकांतजी मुळे, विद्यासभा उपाध्यक्ष तथा केंद्रिय कार्यकारिणी सदस्य मा. उमेशजी जगताप मुख्याध्यापक श्री विजेंद्र चौधरी, पर्यवेक्षक श्री दत्तात्रय तांबारे, अभ्यास पूरक प्रमुख सौ सुजाता चिंचपूरकर व इतर शिक्षक सहकारी गण उपस्थित होते.

# जयभवानी महाविद्यालयात दिली नवमतदारांना शपथ

बीड । प्रतिनिधी

जयभवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे कला व विज्ञान महाविद्यालय ,शिवाजीनगर गढी येथे राज्यशास्त्र, लोकप्रशासन व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मतदार जनजागृती अभियानांतर्गत परीक्षार्थी विद्यार्थ्यांना मतदान प्रक्रिया बाबतचे मार्गदर्शन व प्रबोधन करण्यात आले. तसेच त्यांना प्रतिज्ञा देण्यात आली.

यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफे. डॉ. सदाशिव सरकटे म्हणाले की, सद्यस्थितीमध्ये संपूर्ण देशामध्ये निवडणुका होत आहेत या निवडणुकांचा उत्सव साजरा करण्यात आला पाहिजे.परंतु दुर्दैवाने आपल्या देशामध्ये मतदारांमध्ये उदासीनता असलेली पहावयास मिळते. एरवी




आपल्या देशामध्ये गल्लीपासून ते दिल्लीपर्यंत राजकारण्यांनी हे केलं पाहिजे ते केलं पाहिजे अशा प्रकारच्या गप्पा पारावर मारल्या जातात परंतु निवडणूक प्रक्रियेमध्ये अनेक तज्ञ लोक मतदान प्रक्रियेमध्ये सहभाग घेत नाहीत आणि ज्यांना स्वतःची मते नाहीत अशी लोक मतदान प्रक्रियेच्या दिवशी फिरत राहतात यासाठी सर्वच लोकांनी निवडणूक प्रक्रियेमध्ये भाग घेतला पाहिजे असे आवाहन यावेळी करण्यात आले.यावेळी राज्यशास्त्र विभागाचे प्रा. डॉ.जयराम ढवळे म्हणाले की, आपल्या देशाने संसदीय लोकशाही प्रणाली स्वीकारली ही लोकशाही प्रणाली सुदृढ, स्वच्छ आणि पारदर्शक करायची असेल तर निवडणूक प्रक्रियेमध्ये सर्व मतदारांनी सहभाग घेतला पाहिजे तसेच आपल्या गावातील घरातील प्रत्येकाला मतदान प्रक्रियेमध्ये भाग घेण्यास सहकार्य केले पाहिजे .आपल्या एका मतामुळे चांगला उमेदवार निवडून येऊ शकतो तसेच आपल्या निष्क्रियतेमुळे चांगला उमेदवार पराभूत होऊ शकतो म्हणून आपण सर्वांनी निवडणूक प्रक्रियेमध्ये सहभाग घ्यावा असे आवाहन यावेळी करण्यात आले. यानंतर सर्व विद्यार्थ्यांना मतदानाबाबत प्रतिज्ञा ( शपथ) देण्यात आली. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ. शिवाजी काकडे, लोकप्रशासन विभागाचे प्रोफे. डॉ धर्मराज कटके व प्रा. शिल्पा ससाणे, प्रा .रमेश रिंगणे ,प्रा.हिरा पोटकुले, प्रा.डॉ. रामदास खताळ,प्रा. डॉ.जाहेद सिद्दिकी प्रा.डॉ. शिवलाल घुगे, इ. प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संतांचे उपकार हे मानवी जीवाच्या कल्याणाकरिताच आहेत-प्रभाकर बोधले

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील तांदळवाडी भिल्ल येथे श्री संत वामनभाऊ महाराज यांनी प्रारंभित केलेल्या श्रीक्षेत्र गहिनीनाथ गडाच्या ९२ व्या फिरत्या नारळी सप्ताहात महंत हरिभक्तिपरायण विठ्ठल महाराज श्रीक्षेत्र गहिनीनाथ गड( चिंचोली नाथ) यांच्या हस्ते व शुभ मार्गदर्शनाखाली ६व्या कीर्तन पुष्पात काय सांगू आता संतांचे उपकार / मज निरंतर जागविती //१ / / या संत तुकाराम महाराज यांच्या चार चरणी अभंगातून हरिभक्ति परायण प्रभाकर दादा बोधले हे संत बिघडलेल्या समाजास योग्य दिशा देण्याचे काम करतात असे सांगतात.

आपल्या अभंग निरूपणातून बोलताना हरिभक्तिपरायण प्रभाकर दादा बोधले म्हणाले की ,या भूतलावर अनेक साधुसंत झाले. त्यांनी समाजावर फार मोठे उपकार केले आहेत. ते आले म्हणून आपले




जीवनमान ठीक आहे. सध्याच्या काळात ६०% समाज हा व्यसनात बिघडत चाललेला आहे. वारकरी संप्रदायातील संत व्यसनाचे दुष्परिणाम कीर्तन माध्यमातून वारंवार सांगून परिवर्तन घडवून आणतात. इतर लोक हे स्वत:पुरते आपल्या करिताच उपकार करतात पण संतांचे तसे नाही. ते सर्वांचे कल्याणच पाहतात. इतरांच्या उपकाराची फेड करता येते पण संतांचे उपकार जीवनाचे परम कल्याण करणारे असून ते उपकार फेडता येत नाहीत. नदी वाहते त्यावेळी ती काठावरील लोकांच्याच उपयोगास पडते ,गाय वासराकरता पान्हा फोडते पण आपणास दूध मिळते .वृक्ष फळ, सावली देतात, आई हे आपल्याच मुलावर उपकार करते इतरांच्या नाही .यांचे उपकार हे सहज आहेत पण संतांचे उपकार हे जाणून-बूजून जगाकरताच असतात. या अभंगात १)मज निरंतर जागविती, २)सहज बोलणे हित उपदेश ३) मज सांभाळिती असे सायास करून शिकवितात व सांभाळतात .ते जागवितात म्हणजे निरंतर शिकवितात. भगवंताचे स्मरण भावाने केल्यास आपले जीवनातील अनेक दुःख, व्यथा दूर होतात .सत्ता, संतती व संपत्तीच्या मागे सर्व जग लागले आहे त्यात ते अडकतात. आपण मेल्यावर मुलगा लगेच आपले नाव लावतो .आपण दाराची रात्रंदिवस सेवा करतो ही झोपच आहे. क, का, की या शब्दात आपण अडकतो .कनक कामिनी व कीर्ती ही आपली झोप आहे ते सत्य वाटते हा आपला भ्रम आहे .ती अविद्या आहे यासाठी संत हे स्वतः जागतात व दुसऱ्याला जागवितात. म्हणजे शिकवतात. त्यांच्यात जगाच्या उद्धारासाठी तळमळ असून, हिताचे बोलतात, शिकवितात व संभाळणूक करतात. म्हणून संतांचे उपकार इतर सर्व उपकार करणाऱ्या पेक्षा मोठे आहेत असेही ते यावेळी म्हणाले. यावेळी महंत विठ्ठल महाराज श्रीक्षेत्र गहिनीनाथ गड ,महंत जनार्दन स्वामी श्रीक्षेत्र मच्छिंद्रगड, मृदंगमणी विठ्ठल बापू वाघमारे पंढरपूर ,रामहरी रसाळ गुरुजी विभागीय प्रवक्ता ,अनंत घीगे जिल्हा प्रसिद्धी प्रमुख, अखिल भारतीय वारकरी मंडळ, श्रीराम सांगूळे सरपंच तांदळवाडी,दिलीप केदार गुरुजी, सुभाष केदार गुरुजी, राम महाराज शास्त्री, आत्माराम सानप, जनार्दन महाराज भिसे, सुदाम ठाकर, सखाराम सानप आबा सांगूळे,व गायक म्हणून मोहन महाराज सुरवसे अर्जुन महाराज दौंड भाऊसाहेब महाराज खेडकर सुखदेव महाराज बटुळे निलेश महाराज खेडकर, श्रीक्षेत्र गहिनीनाथ गडावरील सर्व टाळकरीआणि मृदंगमणी म्हणून ज्ञानेश्वर महाराज भोसकर रूई तर २५ हजाराच्या वर भाविक भक्त उपस्थित होते.

दैनिक राज्य लोकतंत्र

महासंग्राम

बुधवार दि.१ मे २०२४ | ६



# पंकजाताई मुंडे यांना लोकसभेत पाठवणे आमची नैतिक जवाबदारी

## परळी शहरातील विविध समाज घटकांच्या बैठकीत खा.प्रितमताईंना मतदारांची ग्वाही

**परळी । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील सर्वसमाज घटकांना एकत्र करून विकासाची विविध लोकाभिमुख कामे केल्यामुळे पंकजाताईंच्या माध्यमातून राज्यात आणि देशात परळीचे नाव उंचावले आहे. राज्याच्या मंत्री म्हणून काम करताना लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्या प्रमाणे सर्वांना सोबत घेऊन वंचित, उपेक्षित, दुर्लक्षित घटकांना पंकजाताईंनी न्याय देण्याचं काम केल आहे. मुख्यमंत्री ग्रामसडक योजना, जलयुक्त शिवार, महिला बचत गट इत्यादी योजनांच्या माध्यमातून आम्हाला नवी ओळख मिळवून देणाऱ्या कर्तबगार लेकीला परळीकर म्हणून लोकसभेत पाठवण्याची नैतिक जवाबदारी आमची आहे आणि ही जवाबदारी आम्ही नेकीने पार पाडू अशी ग्वाही परळी शहरातील मतदारांनी खा. प्रितमताई मुंडे यांना दिली.

भाजप आणि महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारानिमित्त खा. प्रितमताई मुंडे यांनी परळी शहरातील वकील संघ, सुवर्णकार समाज आणि भावसार समाजाच्या बैठकीत मतदारांशी संवाद साधला. विकासाचा दृष्टिकोन आणि नेतृत्व करण्याची सक्षमता असलेल्या उमेदवार म्हणून पंकजाताई मुंडे यांच्या पाठीशी मतदानरुपी आशीर्वाद उभे करून लोकसभेच्या विजयात मताधिक्याच योगदान दया असे आवाहन खा. प्रितमताई मुंडे यांनी केले.

दरम्यान परळी शहरातील भावसार समाजातील प्रतिष्ठित नागरिकांनी पंकजाताई मुंडे यांना बिनशर्त पाठींबा देऊन संपूर्ण जिल्ह्यातून शंभर टक्के मतदान मिळवून देऊ असा शब्द भावसार समाजाच्या वतीने दिला. तर सुवर्णकार समाजाने पंकजाताई मुंडे यांना पाठींबा देऊन परळीच्या लेकीला सन्मानजनक मताधिक्य देऊन लोकसभेत पाठवण्याचा निर्धार व्यक्त केला.





### सुवर्णकार समाज, भावसार समाजासह वकील संघाचा पंकजाताईंना बिनशर्त पाठींबा

### सुज्ञ मतदार पंकजाताईंच्या विकासाभिमुख नेतृत्वासोबत

परळी वकील संघाच्या बैठकीत शहरातील जेष्ठ विधिज्ञांनी वकील संघ पंकजाताई मुंडे यांच्या पाठीशी असल्याचे सांगताना जातीपातीच्या राजकारणाला थारा न देता परळीच्या लेकीला सन्मानजनक विजय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. बीड जिल्ह्यातील सुज्ञ मतदार हा नेहमीच विकासाच्या मुद्द्यावर सक्षम नेतृत्वाच्या पाठीशी राहिला आहे, उमेदवाराची नेतृत्व क्षमता, विकासाचे ध्येयधोरण, भविष्याची गरज बघून मतदान करणारा वर्ग पंकजाताईंच्या पाठीशी आहे, सर्वांगीन विकासाचे व्हिजन असलेल्या उमेदवार म्हणून सुज्ञ मतदार पंकजाताईंच्या विकासाभिमुख नेतृत्वासोबत असल्याची भावना या बैठकीतून पुढे आली.

# आदर्श आचारसंहितेचा भंग झाल्यास निदर्शनास आणून द्यावे : निवडणूक निरीक्षक अजीमूल हक

**बीड । प्रतिनिधी**

आदर्श आचारसंहितेचा भंग झाल्यास निदर्शनास आणून द्यावे, असे आवाहन बीड मतदार संघाचे निवडणूक निरीक्षक अजीमूल हक यांनी मंगळवारी चिन्ह वाटपाच्या समयी राजकीय पक्षांना केले.

राजकीय पक्षांची चिन्ह वाटपाची बैठक तसेच राजकीय पक्षांनी यापुढे घ्यावयाची काळजी या संदर्भातील सूचनांची माहिती देण्याकरिता जिल्हा निवडणूक अधिकारी दिपा मुधोळ मुंडे आणि निवडणूक निरीक्षक अजीमूल हक यांच्या प्रमुख उपस्थितीत बोलविण्यात आली होती. त्यावेळी श्री हक यांनी ही माहिती दिली. यांनी सांगितले सायंकाळी ५ ते ६ या वेळेत शासकीय विश्रामगृह येथे राहणार असून माझ्याशी थेट संपर्क करता येईल. यावेळी त्यांनी त्यांचा संपर्क क्रमांक ९४०४५९२५११ राजकीय पक्षांना दिला आहे.

निवडणूकीच्या काळात प्रत्येक घरावर एका पक्षाचे तीन अथवा तीन पक्षाचे एक-एक ध्वज लावता येतील. गाड्यांवर बॅनर लावता येणार नाही. स्टिकर लावण्यास हरकत नाही. मात्र पुर्वपरवानगी शिवाय लावू नये. निवडणूक काळात आदर्श आचारसंहिताचे पालन करणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य असून त्याला सर्वोच्च न्यायालयाने मान्यता दिलेली आहे. श्री हक यांनी काही मुद्दे आवर्जून सांगितले यामध्ये कोणत्याही पक्षाने तात्पुरत्या स्वरूपात सुरू केलेल्या संपर्क कार्यालयाबाबतची माहिती निवडणूक विभागास द्यावी. संबंधित कार्यालय हे मतदान केंद्राच्या २०० किलोमीटरच्या परिसरात नसावे. तसेच कुठल्याही खाजगी अथवा शासकीय रुग्णालयाच्या शेजारी नसावे. ध्वनी प्रदूषण होणार नाही याची काळजी राजकीय पक्षांनी घ्यावी.

प्रचार प्रसार करताना संरक्षण विभागातील कुठलाही शस्त्रसामुग्री अथवा सैनिकी चिन्हाचा वापर करू नये. प्रचारामध्ये बालकांचा उपयोग होणार नाही याची दक्षता घ्यावी. बाल कामगारांच्या कायद्याच्या विरोधात असल्याचे सांगितले. भारत शासनाने प्लास्टिक बंदी केली असून प्लास्टिकचा



# महायुतीचा आघाडी धर्म निभावत अंबाजोगाई शहरात राष्ट्रवादी काँग्रेसची प्रचारात मुसंडी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्यात भारतीय जनता पक्ष, शिवसेना (शिंदे गट) तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजितदादा पवार यांची महायुती राज्यात अत्यंत उत्तम प्रकारे शासन चालवीत आहेत . राज्यातील लोकसभा निवडणुकीत देखील या तिन्ही पक्षांची महायुती म्हणूनच निवडणूक लढवल्या जात आहे. बीड लोकसभेच्या महायुती च्या उमेदवार पंकजा मुंडे यांचा प्रचार देखील राष्ट्रवादी काँग्रेसचे उपाध्यक्ष राजकिशोर मोदी व त्यांच्या सहकाऱ्यांनी मिळून अंबाजोगाई शहरात विविध भागांतील प्रचारात जोरदार मुसंडी मारल्याचे दिसून आहे.

सोमवार दि २९ रोजी राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने बीड लोकसभेच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ कुत्तर विहीर, जैन गल्ली, भट गल्ली, बाराभाई गल्ली,खतीब गल्ली, छल्ला , धनगर गल्ली, कैकाड गल्ली, रविवार पेठ, बलुतेचा मळा या परिसरातुन मोठी रॅली काढण्यात आली होती. या रॅलीद्वारे अंबाजोगाई शहरातील त्या त्या परिसरसतील नागरिकांशी थेट संवाद साधून मतदारांना पंकजा मुंडे यांना मतदान करून एक चांगला उमेदवार लोकसभेत पाठवून आपल्या मागासलेल्या बीड जिल्ह्याचा विकास करून घेण्याची साद राजकिशोर मोदी यांनी मतदारांनी घातली. मतदार देखील यावेळी त्यांना उत्स्फूर्त असा प्रतिसाद देताना दिसून येत होते. यावरून महायुतीने आपल्या प्रचारात जोरदार मुसंडी मारल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.

या रॅलीसोबत राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष राजकिशोर मोदी, माजी उपनगराध्यक्ष मनोज लखेरा कमलाकर कोपले, माजी उपनगराध्यक्ष बबन लोमटे, तानाजी देशमुख, मनोज लखेरा, महादेव आदमाने, धम्मा सरवदे, सुनील व्यवहारे, कमलाकर कोपले, जीवनदादा कऱ्हाड, सुनील वाघाळकर, प्रवीण जयभाय, गणेश मसने, सुनील वाघाळकर , वजीर शेख,काझी खयामोद्दीन,दत्ता सरवदे,खलील जाफरी,बबन पानकोळी, चंद्रकांत महामुनी,अशोक देवकर, पान ३ वर





# पुरुषांच्या हक्कासाठी निवडणुकीच्या मैदानात

**लखनौ । वृत्तसेवा**


राजकीय पक्ष कोणताही असो त्याच्यासाठी लोकसभा निवडणूक ही अटीतटीचा संघर्ष असतो. प्रत्येकजण स्वत:चा विजय व्हावा म्हणून प्रयत्न करत असतो त्यासाठी प्रचारावरही कोट्यवधींचा निधी खर्च केला जातो पण काहींसाठी मात्र जिंकण्यापेक्षा लढणे महत्त्वाचे असते.

'मेरा अधिकार राष्ट्रीय दल' (मर्द) हा पक्ष त्यापैकीच एक आहे. पुरुषांच्या हक्कांचे संरक्षण हा मुद्दा घेऊन हा पक्ष राजकीय रणमैदानात उतरला आहे. या पक्षाची स्थापना २०१८ मध्ये झाली त्यानंतर त्याने अनेक महत्त्वाच्या ठिकाणांवरून उमेदवार उभे केले पण त्यांचे साधे डिपॉझिटही वाचू शकले नाही. या निवडणुकीसाठी या संघटनेने स्वत:चा वेगळा जाहीरनामा देखील प्रसिद्ध केला असून ' बेटों के सम्मान में, मर्द उतरे मैदान मे' अशी त्याची टॅगलाईन आहे. या पक्षाने आतापर्यंत लखनौ, रांची आणि गोरखपूर येथून उमेदवार जाहीर केले आहेत. याआधी या पक्षाने २०१९ मध्ये वाराणसी, लखनौ या मतदारसंघांमध्ये वेगवेगळ्या निवडणुका लढविल्या आहेत. २०२० मध्ये झालेली बांगार्मू विधानसभा निवडणूक आणि बरेली, उत्तर लखनौ, बक्षी तालाब (लखनौ) आणि चौरीचौरा येथूनही या पक्षाचे उमेदवार पान ३ वर



### पक्षाची आश्वासने

पुरुषांसाठी वेगळे मंत्रालय तयार करणार. राष्ट्रीय पुरुष आयोगाची स्थापना करणार. पुरुषांची, सुरक्षा आरोग्यासाठी वेगळे धोरण. पुरुष सुरक्षा विधेयक संसदेमध्ये आणणार.



## मनसेची लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बैठक संपन्न

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पदाधिकारी यांची लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बैठक दि २९ एप्रिल मंगळवार रोजी घेण्यात आली.या बैठकीला शहरातील अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.यावेळी महीला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा रेखा अंभोरे,जिल्हा उपाध्यक्ष गणेश वाघमारे,शहराध्यक्ष गोविंद,अविनाश गायकवाड,महीला आघाडीच्या जिल्हा उपाध्यक्ष शेळके ताई,सुमित इंगळे, सुधाकर कुटे, नामदेव सरवदे, जितेंद्र कुटे आदी सह अनेक कार्यकर्ते या बैठकीला उपस्थित होते ही बैठक तालुकाध्यक्ष धोंडीराम जाधव यांनी आयोजित केली होती.मनसे कार्यालयात बैठक पार पडली.या बैठकीत लोकसभा निवडणूक संदर्भात चर्चा करण्यात आली.

# रायबरेली आणि अमेठीत सस्पेन्स कायम

**अमेठी । वृत्तसेवा**

उत्तर प्रदेशसह संपूर्ण भारतात पहिल्या आणि दुसऱ्या टप्प्यातील मतदान पूर्ण झाले आहे. पहिल्या टप्प्यातील मतदान १९ एप्रिल रोजी झाले असून दुसऱ्या टप्प्यातील मतदान २६ एप्रिल रोजी झाले. परंतु अमेठी आणि रायबरेली या जागांवर कोण निवडणूक लढवणार हे काँग्रेसकडून अद्याप स्पष्ट झालेले नाही. उत्तर प्रदेश, रायबरेली आणि अमेठी या व्हीव्हीआयपी लोकसभा जागांसाठी काँग्रेस कोणाला उमेदवारी देणार यावर अजूनही सस्पेंस आहे.

याचदरम्यान, काँग्रेस नेते दीपक सिंह यांनी भाजपवर टीकास्त्र सोडले आहे. अमेठी आणि रायबरेलीमधून राहुल गांधी आणि प्रियंका गांधी यांच्या उमेदवारीबद्दल विचारले असता, काँग्रेस नेते दीपक सिंह म्हणाले की आम्हा सर्वांना विश्वास आहे की राहुल गांधी, प्रियंका गांधी येतील आणि भाजपाचा पराभव करतील. एकीकडे सोनिया गांधी राज्यसभेवर गेल्यानंतर रायबरेलीमध्ये चर्चा सुरू आहे, तर दुसरीकडे अमेठीमध्ये केंद्रीय मंत्री स्मृती इराणी यांनी राहुल गांधींना याच लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढवून दाखवा असे आव्हान दिले आहे. सोनिया पान ३ वर



### 'वंचित'ने उत्तर मुंबईचा उमेदवार बदलला

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यात लोकसभा निवडणूकीत मतदानाचे दोन टप्पे पार पडले तरी वंचित बहुजन आघाडीने उमेदवार बदलण्याचा सिलसिला सुरूच ठेवला आहे. वंचितने उत्तर मुंबईतून जाहीर केलेल्या उमेदवारांच्या ऐवजी आता सोनल गोंदाणे यांना उमेदवारी जाहीर केली आहे.

उत्तर मुंबईमधून उत्तर भारतीय चेहरा म्हणून बीना रामकुबेर सिंग यांना उमेदवारी दिली होती. मात्र, उमेदवाराने माघार घेतल्याने उमेदवारी बदलाची वेळ वंचित बहुजन आघाडीवर आली. त्यानुसार गोंदाणे यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे.

# आ.संदीप क्षीरसागर, बजरंग सोनवणेंसह बालाघाटावर शेतकऱ्याच्या पोराला मतदानारूपी आशिर्वादाचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील बालाघाट परिसरातील गावांमध्ये जाऊन आ.संदीप क्षीरसागर व बजरंग सोनवणे यांनी लोकांच्या प्रत्यक्ष भेटीगेटी घेत शेतकर्याच्या पोराला मतदानरुपी आशिर्वाद द्या असे आवाहन करत प्रचार दौरा केला.

सोमवार (दि.२९) रोजी बीड तालुक्यातील वानगाव, गोगलवाडी, रौळसगाव, अंजनवती, वडवाडी/बोरखेड, महाजनवाडी, लोणी घाट, गोलंग्री, कानडी घाट, सुलतानपूर, घारगाव या बालाघाटावरील गावांमध्ये जाऊन गावकर्यांशी थेट संवाद साधत आ.संदीप क्षीरसागर यांनी प्रचार दौरा केला. यावेळी इंडिया आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे हेही सोबत होते. आ.क्षीरसागर व बजरंग सोनवणे यांनी, गावकर्यांना एकदा तुमच्यातल्याच एका शेतकर्याच्या पोराला मतदानरूपी आशिर्वाद द्या आणि आपले प्रश्न जाणणारा आणि मांडणारा खासदार तुमच्याच आशिर्वादाने बीड जिल्ह्याला द्या असे नम्र आवाहन केले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासह इंडिया आघाडीतील पान ३ वर



# शेतकऱ्याला न्याय देवू शकले नाहीत ते जिल्ह्याला काय देणार

## वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार हिंगे यांचा पत्रकार परिषदेत विरोधकांवर हल्लाबोल

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई - २००९ साल पासून बीड जिल्ह्याची सत्ता मुंडे घराण्याकडे असतानाही साधा रेल्वेचा प्रश्न सोडवता आला नाही. कारखान्याला नेलेला शेतकर्याच्या ऊसाचे पैसे दिले नाहीत. तर दुसर्या उमेदवाराने बीड जिल्ह्याचा ऊस पश्चिम महाराष्ट्रा गेल्यावर तेराची रिकव्हरी येते मग आपल्या जिल्ह्यातल्या कारखान्यात साडेदहाचाच उतार का येता असा हल्लाबोल करत असा दोन्ही उमेदवरांवर वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे यांनी अंबाजोगाई येथील आयोजित पत्रकार परिषदेत केले.

बीड लोकसभा निवडूकीतील मोठी रंगत आली असून अंबाजोगाई शहरामध्ये देशातील मात्तबर नेत्यांच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ सभा होणार आहेत. यात पंतप्रधान नरेंद्र मोदी, शरद पवार व वंचित बहुजन आघाडीचे अ‍ॅड.बाळासाहेब आंबेडकर यांच्या सभेचे आयोजन करण्यात आले आहे. बीड जिल्ह्यात राष्ट्रीय नेत्यांना अंबाजोगाईचेच केंद्रस्थान दिसू लागले आहे. परंतु या भागातील विकासावर अद्यापही नेत्याने पान ३ वर



### ३ मे रोजी होणार अ‍ॅड.बाळासाहेब आंबेडकरांची सभा

बीड जिल्ह्याचे लोकसभेचे उमेदवार अशोक हिंगे यांच्या प्रचारात वंचित बहुजन आघाडीचे अ‍ॅड.बाळासाहेब आंबेडकर यांची सभा ३ मे रोजी सायंकाळी ५ वाजता मोंढा मैदानावर होणार असून या सभेस उपस्थित राहण्याचे आवाहन उमेदवार अशोक हिंगे यांनी केले आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske, Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# शहरातील अनधिकृत रेडीमिक्स काँक्रीट प्लांट चालकांना महापालिकेचा दणका

पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी

शहरात अनधिकृतपणे सुरू असलेल्या तसेच हवा आणि ध्वनी प्रदूषण करणाऱ्या पुनावळेतील गायकवाड नगर आणि चिखली येथे सुरू असलेल्या गृहप्रकल्प बांधकाम साईटवरील रेडीमिक्स काँक्रीट (आरएमसी) प्लांटवर पिंपरी-चिंचवड महापालिकेने कारवाई केली असून ते दोन्ही प्लांट सील करण्यात आले आहेत. त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येणार आहेत.



आरएमसी प्लांटमधून मोठ्या प्रमाणात उडणाऱ्या धुळीमुळे आजूबाजूच्या रहिवाशांना आणि नागरिकांना श्वसनाचा तसेच, त्या प्रकल्पांमधून निघणाऱ्या आवाजामुळे ध्वनी प्रदूषणाचा त्रास होत आहे. या संदर्भात महापालिकेच्या पर्यावरण विभागास अनेक तक्रारी आल्या होत्या. तक्रारींची दखल घेऊन महापालिकेच्या पथकाने प्लॉट क्रमांक २५, गायकवाडनगर, पुनावळे येथील एस.व्ही.टी. एन कंन्स्ट्रक्शन प्रा. लि. तर्फे सोमानी टॉवर्सची आणि चिखली येथील ऐश्वर्यम हमारा येथील आरएमसी प्लांटची प्रत्यक्ष पाहणी केली. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे तसेच, महापालिकेचे ना हरकत दाखला व इतर आवश्यक परवाने त्यांच्याकडे नव्हती. ते परवानगी न घेता अनधिकृतपणे व्यवसाय चालवित असल्याचे महापालिकेच्या निदर्शनास आले.

महापालिकेच्या पर्यावरण अभियांत्रिकी विभागाचे सहशहर अभियंता संजय कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यावरण पथकातील प्रदीप महाले, जगन्नाथ काटे, बाबासाहेब ढोकळे, कनिष्ठ अभियंता स्वप्निल पाटील, मल्टिपर्पज वर्कर गोरक्षनाथ करपे, एमएसएफ व मेस्को जवानांच्या पथकाने प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन पाहणी केली.

# 'जलसंपदा'च्या मनमानी कारभारा-विरोधात शेतकऱ्यांचे ठिय्या आंदोलन

नारायणगाव । प्रतिनिधी

येडगाव धरणासाठी परिसरातील शेतकऱ्यांचा मोठा त्याग आहे. बहुतांशी शेतकऱ्यांच्या या धरणामध्ये जमिनी गेल्या आहेत. मात्र या बाधित शेतकऱ्यांचे योग्य पद्धतीने पुनर्वसन झालेले नाही. त्यातही वेळेवर धरणातून शेतीसाठी पाणी मिळत नाही आणि वीजपंपाचे जोड तोडले जात आहेत. यामुळे संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी जलसंपदा विभागाच्या नारायणगाव कार्यालयाच्या कार्यकारी अभियंत्यांना खुर्चीवर बसू देणार नाही, असा इशारा दिला आहे. अशी माहिती धरणग्रस्त संघर्ष समितीचे अध्यक्ष बाबाजी नेहरकर यांनी दिली.

येडगाव धरणातून कुकडी नदीतून पूर्ण क्षमतेने पाणी शिरूर नगरपरिषदेच्या हद्दीत पिण्यासाठी नेणे शक्य व्हावे, म्हणून धरणालगतच्या सर्व शेतकऱ्यांच्या



कृषीपंपांचे वीजजोड दोन दिवसांपूर्वी नारायणगाव येथील जलसंपदा विभागाने महावितरणच्या कर्मचाऱ्यांकडून तोडले. परंतु स्थानिक शेतकरी आक्रमक झाल्याने आणि आमदार अतुल बेनके यांनी मध्यस्थी केल्यामुळे हे वीजजोड पुन्हा जोडून देण्यात आले. तथापि शिरूरला पाणी पूर्ण क्षमतेने नेण्यासाठी पुन्हा कृषीपंपांचे वीजजोड तोडावे लागेल, अशी माहिती उपविभागीय अभियंता आर. जे. हांडे यांनी शेतकऱ्यांना दिली होती. त्यामुळे संतप्त झालेल्या शेतकऱ्यांनी जलसंपदा विभागाच्या नारायणगाव कार्यालय आवारात मंगळवारी (दि. ३०) ठिय्या आंदोलन केले.सरपंच सीमा भोर, उपसरपंच अंकुश भोर, शिवसेनेचे उपतालुकाप्रमुख सह्याद्री भिसे, माजी उपसरपंच हर्षल गावडे, माजी सरपंच देविदास भोर, कांदळीचे माजी उपसरपंच अनिल भोर, प्रमोद शिंदे, शिवाजी गावडे, सचिन भोर, मोहन हांडे, सुजाता जाधव, नीलम खरात, मधुकर शिंदे, राजू ढवळे, गिरीश बांगर आदी शेतकरी या वेळी उपस्थित होते.

# विद्यापीठ होणार 'ऑक्सफर्ड ऑफ द सेंटर आशिया'

पुणे : : 'ऑक्सफर्ड ऑफ द इस्ट' म्हणून प्रसिद्ध असलेले सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ लवकरच आपल्या ज्ञानशाखा विस्तारत 'ऑक्सफर्ड ऑफ द सेंटर आशिया' बनण्याचा मार्गावर आहे. याचाच एक भाग म्हणून सोमवारी (दि.२९) मध्य आशियातील तीन आंतरराष्ट्रीय विद्यापीठांनी पुणे विद्यापीठाच्या आशय पत्रावर (लेटर ऑफ इंटेट) स्वाक्षरी केली. विद्यापीठाच्या शिवाजी सभागृहात झालेल्या या कार्यक्रमात विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, कॅस्पियन युनिव्हर्सिटी, कझाकस्तानचे रेक्टर नुसेनोव्ह झोल्डास्बेक, इस्ट युरोपियन युनिव्हर्सिटी, जॉर्जियाचे रेक्टर डॉ. काखाबेर लाझाराहविली आणि किर्गिझ प्रजासत्ताक, किरगिझस्तानच्या इंटरनॅशनल युनिव्हर्सिटीचे रेक्टर प्रा. अल्दारारालिव्ह असिलबेक, विद्यापीठाचे प्र- कुलगुरू डॉ. पराग काळकर, प्रभारी कुलसचिव डॉ. विजय खरे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे आदी उपस्थित होते.



कझाकस्तानमधील कॅस्पियन युनिव्हर्सिटी, जॉर्जियामधील इस्ट युरोपियन युनिव्हर्सिटी आणि किरगिझस्तानमधील इंटरनॅशनल युनिव्हर्सिटीच्या शिष्टमंडळाने सोमवारी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाला भेट दिली. या वेळी त्यांनी आशय पत्रावर स्वाक्षरी करत शैक्षणिक आणि प्रशासकीय बाबींची देवाण-घेवाण करण्यासंबंधी चर्चा केली. या प्रसंगी डॉ. गोसावी म्हणाले, विद्यापीठ आपले पाय आंतरराष्ट्रीय स्तरावर रोवत असून ही आशय पत्रावरील स्वाक्षरी म्हणजेच आपल्या 'ऑक्सफर्ड ऑफ द सेंटर आशिया' होण्याच्या मार्गावरील पहिले पाऊल आहे. सोमवारी झालेल्या हेतू पत्रावरील स्वाक्षरीमुळे सहभागी विद्यापीठ एकमेकांची कार्यप्रणाली जाणून घेऊन त्यांच्या विस्तारीकरणावर भर देणार आहेत. या अंतर्गत विद्यार्थी, शिक्षक आणि इतर प्रशासकीय कर्मचार्यांची देवाण-घेवाण करण्यासंबंधी फ्रेमवर्क तयार करण्यात येणार आहे. तसेच, उपलब्ध सुविधा आणि संसाधनांचे आदान-प्रदान करण्यावरही भर देण्यात येणार आहे. याशिवाय याअंतर्गत विविध चर्चासत्र, परिषद आणि कार्यशाळांचेही आयोजन करण्यात येईल. तसेच, विद्यार्थ्यांना परदेशात शिक्षणासाठी नवीन संयुक्त अभ्यासक्रमही बनविण्यात येणार आहे.

# पुणे रेल्वे स्टेशनवरुन ७ महिन्याच्या बाळाचे अपहरण

## बंडगार्डन पोलिसांनी कर्नाटकातून दोघांना अटक करत बाळाची केली सुटका

पुणे । प्रतिनिधी

पुणे रेल्वे स्थानकाच्या परिसरातून सहा महिन्यांच्या बालकाचे अपहरण करण्यात आले होते. हा प्रकार सीसीटीव्हीमध्ये कैद झाला होता. बंडगार्डन पोलिसांनी सीसीटीव्ही आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे गुन्ह्याचा तपास करुन अपहण झालेल्या बाळाची कर्नाटकातून सुखरुप सुटका केली आहे. तसेच अपहरण करणाऱ्या व बाळाला विकत घेणाऱ्या आरोपींना अटक केली आहे.

श्रावण अजय तेलंग (वय-६ महिने) असे अपहरण झालेल्या बालकाचे नाव आहे. याप्रकरणी चंद्रशेखर मालकाप्पा नलूगंडी (वय २४ रा. जांबगी, ज़िल्हा विजापूर, राज्य कर्नाटक), सुभाष पुत्तप्पा कांबळे (वय ५५ रा. लवंगी, जि. दक्षिण सोलापूर) असे अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. याबाबत श्रवणचे वडील अजय तेलंग बंडगार्डन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. ही घटना शनिवारी मध्यरात्री दोनच्या सुमारास पुणे रेल्वे स्थानकाच्या आवारात घडली होती.

तेलंग दाम्पत्य मूळचे भुसावळचे आहे. सासूला भेटण्यासाठी तेलंग आणि त्याची पत्नी पुण्यात आले होते. शनिवारी मध्यरात्री पुणे रेल्वे स्थानकाच्या आवारात तेलंग दाम्पत्य झोपले होते. त्यावेळी अनोळखी व्यक्तीने तेलंग यांचा सात महिन्यांचा मुलगा श्रावण याला उचलून नेले. तेलंग दाम्पत्याला जाग आली. तेव्हा श्रावण जागेवर नसल्याचे आढळून आले. तेलंग दाम्पत्याने त्याचा शोध घेतला. तेव्हा तो सापडला नाही. त्यानंतर घाबरलेल्या तेलंग दाम्पत्याने बंडगार्डन पोलीस ठाण्यात धाव घेऊन फिर्याद दिली.

घटनेचे गांभीर्य ओळखून वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीपान पवार मुलाचा शोध घेण्याच्या सुचना तपास पथकाला दिल्या. तपास पथकाने परिसरातील सीसीटीव्ही तपासले. तसेच मोबाईलचे तांत्रिक विश्लेषण केले असता आरोपीने बालकाला विजापुर येथे घेऊन गेल्याचे निष्पन्न झाले. आरोपीने बालकाचे अपरहण करून त्याला चारचाकी कारमधून प्रथम विजापूर जिल्ह्यातील इंडी येथे नेले. त्यानंतर विजापूर येथे घेऊन गेला.मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

### तपास पथकाचे अधिकारी व अंमलदार यांना विजापूर येथे तात्काळ रवाना करण्यात आले

पथकाने बालकाचा व आरोपीचा शोध घेऊन आरोपी चंद्रशेखर नलूगंडी याला ताब्यात घेतले. त्याच्याकडे सखोल चौकशी केली असता त्याने व त्याचे इतर साथीदारांनी बालकाचे अपहरण केल्याचे सांगितले. तसेच सुभाष पुत्तप्पा कांबळे (वय ५५ रा. लवंगी, जि. दक्षिण सोलापूर) यांना बाळाची विक्री केल्याची माहिती दिली. पोलिसांनी सुभाष कांबळे यांचा शोध घेतला असता तो विजापूर शहरातील एका हॉटेल मध्ये असलेची माहिती प्राप्त झाली. पोलिसांच्या पथकाने हॉटेल मध्ये छापा टाकून आरोपीला ताब्यात घेऊन आपहरण बालकाची सुखरुप सुटका केली आहे. ही कारवाई पोलीस उपायुक्त स्मार्तना पाटील पाटील यांच्या

# महाराष्ट्रातील जनता परिवर्तन करण्याच्या मन:स्थितीत : शरद पवार

उरुळी कांचन : महाराष्ट्रात लोकांची मन:स्थिती परिवर्तन करण्याची आहे. दहा वर्षांत देशाचा कारभार करण्याची जबाबदारी ज्यांच्याकडे होती, त्यांची काम करण्याची पध्दत पाहून लोक अस्वस्थ आहेत. देशाच्या संविधानाला कोणीही धक्का लावू शकत नाही, हे दाखवून देण्याची ताकद सर्वसामान्यांमध्ये आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ नेते खासदार शरद पवार यांनी केले. उरुळी कांचन येथे महाविकास आघाडीतील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार खासदार डॉ. अमोल कोल्हे यांच्या प्रचारार्थ आयोजित सभेत पवार बोलत होते. या वेळी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, डॉ. अमोल कोल्हे, आमदार अशोक पवार, जिल्हाध्यक्ष जगन्नाथ शेवाळे, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अशोक खांडेभराड, काँग्रेसचे देविदास भन्साळी आदी उपस्थित होते.



शरद पवार म्हणाले की, या सरकारचे शेतीवरचे लक्ष कमी होत आहे. या देशाचा कारभार हुकूमशाही पध्दतीने सुरू आहे. मोदींचा संसदीय लोकशाही पद्धतीवर विश्वास नाही. या देशाची घटना बदलण्याचे काम त्यांना करायचे आहे आणि म्हणूनच ४०० पारचा नारा ते देतायेत. तुमच्या सांगण्यावरून भूमिका बदलली नाही, स्वाभिमान गहाण टाकला नाही; म्हणून निधी अडविला असला, तरी शिरूरची जनता तुम्हाला उत्तर दिल्याशिवाय शांत बसणार नाही, अशा कडक शब्दांत महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ. अमोल कोल्हे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना या जाहीर सभेत थेट सुनावले. देशात मत मागायच्या पद्धती बदलल्या आहेत. काम सांगून मत मागायचे दिवस गेलेत; कारण भाजपला एक काम सांगता येत नाही, अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी केली.

## राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून कोथरूड येथील हॉटेलचालकासह मद्यपींवर गुन्हे दाखल

पुणे: राज्य उत्पादन शुल्क पुणे विभागाच्या पथकाने कोथरूड येथील हॉटेल खिंड ढाब्यावर टाकलेल्या छाप्यात ढाबाचालक ग्राहकांना मद्य पिण्याची व्यवस्था करुन देत असताना आढळून आला. या प्रकरणात ढाबाचालकासह चार मद्यपींना अटक करुन एकाच दिवसात आरोपपत्र दाखल करुन न्यायालयासमोर सादर केले असता न्यायालयाने ढाबाचालकाला १ लाख रूपयांचा दंड, मद्यपी ग्राहकांना प्रत्येकी २ हजार रुपये दंड व दंड न भरल्यास दोन महिन्याच्या साध्या कैदेची शिक्षा सुनावली.

राज्य उत्पादन शुल्क 'सी' विभागाच्या पथकाने शनिवार (ता.२७) रोजी कोथरूड येथील हॉटेल खिंड या ढाब्यावर छापा टाकला असता ढाबा चालक योगेश सुरेश माथवड हा ग्राहकांना मद्य पिण्याची व्यवस्था उपलब्ध करुन देत असताना आढळून आल्याने त्याचेसह चार मद्यपी ग्राहकांना अटक करण्यात आली. या गुन्ह्यातील तपास अधिकाऱ्यांनी एकाच दिवसात तपास पूर्ण करून आरोपपत्र न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कोर्ट क्र. १ शिवाजी नगर, पुणे यांच्या न्यायालयात सादर केले.

ही कारवाई राज्य उत्पादन शुल्क विभागाचे दुय्यम निरीक्षक प्रताप बोडेकर, किरण पाटील, सहायक दुय्यम निरीक्षक संदिप लोहकरे, महिला जवान उज्वला भाबड, जवान शरद भोर, गोपाळ कानडे व वाहनचालक सचिन इंदलकर यांच्या पथकाने पार पाडली.

लोकसभा निवडणूक २०२४ च्या आचारसंहितेच्या पार्श्वभूमीवर राज्य उत्पादन शुल्क पुणे विभागाकडून बेकायदेशीर तसेच बनावट मद्य निर्मिती, वाहतूक व विक्री यावर नियंत्रण ठेवण्यासाठी पथके नेमण्यात आली असून परराज्यातील दारुच्या अवैध वाहतुकीवर करडी नजर ठेवण्यात येत आहे. ढाबा, हॉटेलच्या अचानकपणे तपासण्या करण्यात येत आहेत. ढाब्यावर दारु विक्री करणे तसेच त्याठिकाणी बसून दारु पिणे कायद्याने गुन्हा आहे. कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध यापुढेही अशाच प्रकारे कडक कारवाया केल्या जातील, असे राज्य उत्पादन शुल्क सी विभागाचे निरीक्षक एस. एस. कदम यांनी कळविले आहे.

# सुनेत्रा पवारांना शेतकरी कृती समितीचा बिनशर्त पाठिंबा : सतीश काकडे

सोमेश्वरनगर :: शेतकरी कृती समितीचे जिल्हाध्यक्ष सतीश काकडे यांनी बारामती लोकसभेच्या महायुतीच्या उमेदवार सुनेत्रा पवार यांना जाहीर पाठिंबा दिला आहे. गडदरवाडी येथे सोमेश्वर कारखान्याचे संचालक अभिजित काकडे यांनी सोमेश्वर व पुरंदर परिसरातील कार्यकर्त्यांचा मेळावा आयोजित केला होता. यामध्ये एकमताने हा निर्णय घेण्यात आला. या वेळी शेतकरी कृती समितीचे जिल्हाध्यक्ष सतीश काकडे, माजी आरोग्य आणि बांधकाम सभापती प्रमोद काकडे, सोमेश्वरचे संचालक अजय कदम, शहाजी जगताप, माजी संचालक दिलीप फरांदे, दिग्विजय जगताप, संतोष कोंढाळकर, सतीशराव जगताप, नंदकुमार शिंगटे, वैभव गायकवाड यांच्यासह प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

या वेळी बोलताना सतीश काकडे म्हणाले, या निवडणुकीत पवार कुटुंबाच्या अंतर्गत कलहात आपण लक्ष न देता सुनेत्रा पवार यांना मत दिल्यास ते मत थेट देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना मिळणार आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे नरेंद्र मोदी व अमित शहा यांच्याशी थेट संबंध असून या




दोघांच्या भेटीसाठी त्यांना कुणाच्या मध्यस्थीची गरज नाही.

त्यामुळे बारामती तालुक्याच्या सर्वांगीण विकासास मिळालेली गती पाहता उर्वरित भोर, पुरंदर, खडकवासला, दौंड, इंदापूर या तालुक्यांचा विकास होण्यासाठी केंद्र सरकारची मदत घेऊन मतदारसंघाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी स्थानिक गटातटाचे राजकारण बाजूला ठेवून सर्वांनी सुनेत्रा पवार यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करण्याचे अवाहन सतीश काकडे यांनी केले. शेतकरी कृती समितीच्या वतीने जाहीर बिनशर्त पाठिंबा सुनेत्रा पवार यांना देण्याचा एकमुखी निर्णय मेळाव्यात घेण्यात आला.

सोमेश्वर कारखान्याने सभासदांच्या जानेवारी महिन्यामध्ये तुटणार्या उसास ७५ रुपये, फेब्रुवारीतील उसाला १०० रुपये व मार्च महिन्यात तुटणार्या उसास १५० रुपयांपर्यंत प्रतिमेट्रिक टन अनुदान जाहीर केले होते. तसेच एप्रिलपासून तुटणार्या उसास २०० रुपये प्रतिमेट्रिक टन अनुदान मिळणार आहे. ज्या सभासदांचे जळीत उसाचे अंदाजे २ लाख मेट्रिक टनाचे ५० रुपये प्रतिमेट्रिक टन याप्रमाणे कपात केले आहेत ते पैसेदेखील सभासदांना परत मिळणार आहेत. तसेच लवकरच अजित पवार यांना भेटून गेटकेनधारकांना मिळू शकत नसणारे खोडकी बिल ३०० रुपयांप्रमाणे कारखान्याच्या सर्व सभासदांना मिळण्यासाठी प्रयत्न करणार आहे.

# यंदा २४, २५ व २६ मे रोजी होणार पेरा सीईटी-२०२४

## १९ मे रोजी अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस, ३१ मे'ला लागणार निकाल

पुणे । प्रतिनिधी

प्रीमिनेंट एजुकेशन अँण्ड रिसर्च असोसिएशन (झएठ-) अर्थात पेरा या खासगी विद्यापीठांच्या संघटनेच्या वतीने यंदा दि. २४, २५ व २६ मे २०२४ रोजी सीईटी परीक्षा घेण्यात येत आहे. या परीक्षेसाठी अर्ज करण्याचा शेवटचा दिवस १९ मे असून, परीक्षेचा निकाल ३१ मे रोजी घोषित करण्यात येणार आहे, अशी माहिती ऋपेराऋचे अध्यक्ष व एमआयटी एडीटी विद्यापीठाचे कुलगुरू तथा कार्याध्यक्ष प्रा. डॉ.मंगेश कराड यांनी दिली.

या परीक्षेसंदर्भात माहिती देण्यासाठी एमआयटी आर्ट, डिजाईन व टेक्नालॉजी विद्यापीठ, विश्वराजबाग, पुणे येथे आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत प्रा. डॉ. कराड बोलत होते. याप्रसंगी जीएसपीएम विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.बी.बी. अहुजा, डी.वाय पाटील विद्यापीठ अंबीच्या कुलगुरू डॉ.सायली गणकर, जी.एच.रायसोनी स्किल टेक विद्यापीठाचे कुलगरू डॉ. एम.यू. खरात, प्र.कुलगुरू डॉ.मोहित दुबे, ऋपेराऋचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रा. हणमंत पवार, स्ट्रॅटेजिक सल्लागार प्रा. डॉ. सुराज भोयर आदी मान्यवर उपस्थित होते.

प्रा. डॉ. कराड पुढे म्हणाले की, राज्यात स्थापित असलेल्या २५ नामांकित खासगी विद्यापीठांमध्ये पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम, जसे की, इंजीनियरिंग, बायोइंजीनियरिंग, फुड टेक्नोलॉजी, मरीन इंजीनियरिंग, अॅग्रो इंजिनिअरिंग, फार्मसी, फाईन आर्ट्स, डिझाईन, मॅनेजमेंट, विधी (लॉ) आणि आर्किटेक्चर या विषयांसाठी प्रवेश घ्यायचा असेल तर ही परीक्षा देणे अनिवार्य आहे. या परीक्षेच्या आधारावर विद्यार्थ्यांना खासगी विद्यापीठांमध्ये प्रवेश प्राप्त होणार आहे. मागील वर्षीप्रमाणे या वर्षीदेखील पेरा-सीईटी कंम्पुटर बेस्ड टेस्ट(सीबीटी) द्वारे घेण्यात येणार आहे. या परीक्षेसाठी विद्यार्थ्यांनी दि. १९ मे पर्यंत ऑनलाईन नावनोंदणी करावी. विद्यार्थ्यांनी अधिक माहितीसाठी ु.शिरिळपवळर.ळप या संकेतस्थळाला भेट द्यावी. गेल्या पाच वर्षांपासून पेराच्या वतीने अशाप्रकारची परीक्षा यशस्वीपणे घेण्यात येत आहे. या माध्यमातून आतापर्यंत राज्यात अडीच लाख विद्यार्थ्यांना विविध विद्यापीठांमध्ये उच्च शिक्षण प्राप्त करून त्यांचे व्यावसायिक करियर पूर्ण करण्याची संधी मिळाली आहे. या वर्षी देखील हजारो विद्यार्थ्यांना राज्यात या माध्यमातून उच्च शिक्षण प्राप्त करून एक उज्ज्वल प्रोफेशनल करियर प्राप्त करण्याची संधी मिळणार आहे.

पेरा या संघटनेची स्थापना ही खासगी विद्यापीठांच्या माध्यमातून शैक्षणिक क्षेत्राला एका उंचीवर नेण्यासाठी आणि उच्च शिक्षणात नवनवीन प्रवाह, आधुनिक तंत्रज्ञान, पाठ्यक्रमांमध्ये नावीन्य आणि लवचिकता आणण्यासाठी झाली आहे. या संघटनेची उच्च शिक्षण, संशोधन आणि इतर अभ्यासक्रमेतर आणि सह-अभ्यासक्रम क्रियाकलापांना प्रोत्साहन देणे, उच्च शिक्षणाच्या सर्वांगीण अनुकूल उन्नतीसाठी आणि प्रगतीसाठी मदत करणे यासारखी महत्वाची उद्दिष्टे आहेत.




पेरा अंतर्गत असलेली विद्यापीठे: एमआयटी-एडीटी, एमआयटी-डब्ल्यूपीयू, संजय घोडावत युनिव्हर्सिटी, संदीप युनिव्हर्सिटी, स्पायसर, डी. वाय. पाटील युनिव्हर्सिटी, डी. वाय. पाटील इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी, अजिंक्य डी. वाय. पाटील युनिव्हर्सिटी, एमजीएम युनिव्हर्सिटी, सिंबायोसिस स्किल्स अॅण्ड प्रोफेशनल युनिव्हर्सिटी, सोमैया विद्याविहार युनिव्हर्सिटी, विजयभूमी युनिव्हर्सिटी, विश्वकर्मा युनिव्हर्सिटी, डी. वाय. पाटील अॅग्रीकल्चर अॅण्ड टेक्निकल युनिव्हर्सिटी, श्री बालाजी युनिव्हर्सिटी, फ्लेम युनिव्हर्सिटी, डॉ. पी. ए. ईनामदार युनिव्हर्सिटी, जेएसपीएम युनिव्हर्सिटी, एनआयसीएमएआर युनिव्हर्सिटी, पिंपरी-चिंचवड युनिव्हर्सिटी, डीईएस पुणे विद्यापीठ, एमआयटी विश्वप्रयाग विद्यापीठ, युनिव्हर्सल एआय विद्यापीठ, जी.एच. रायसोनी स्किल टेक विद्यापीठ आणि संजीवनी विद्यापीठ.

महाराष्ट्र सीईटी परीक्षा आणि जेईई २०२४ सोबत, पेरा ही खाजगी विद्यापीठाची सीईटी परीक्षा आमच्यासाठी तितकीच महत्त्वाची आहे. मला एआय आणि एमएलमध्ये स्पेशलायझेशन सह बीटेकसाठी प्रवेश घ्यायचा आहे. त्यासाठी 'पेरा'द्वारे जागतिक प्रदर्शनासह दर्जेदार शिक्षण देणाऱ्या काही सर्वोत्तम खाजगी विद्यापीठांच्या प्रवेश प्रक्रियेत भाग घेण्याची संधी या प्रवेश परिक्षेद्वारे मिळणार आहे.

– दीया देशमुख, इयत्ता १२वी ची विद्यार्थिनी